# पुणे महानगरपालिका

## सन २०२१-२२

## महापालिका आयुक्त यांचे निवेदन

**स्थायी समितीचे माननीय अध्यक्ष व सभासद,**

मी महापालिका आयुक्त या पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पुणे महानगरपालिकेसारख्या देशातील नांवलौकिक, मोठी लोकसंख्या व कार्यक्षेत्र असलेल्या महानगरपालिकेचे पहिलेच अंदाजपत्रक आज सादर करीत आहे. पुणे शहरास देश-विदेशात स्वातंत्र्य पूर्व काळापासून खुप मोठा ऐतिहासिक, शैक्षणिक, सामाजिक अशा अनेक आघाडयांवर शहराची मान अभिमानाने उंचावेल असा वारसा लाभला आहे. पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने २३ गावांचा समावेश झाला आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेची हद्द ही सुमारे ५१२ चौ.किमी झाली आहे. प्रत्येक प्रशासकीय अधिकाऱ्यास आपल्या प्रशासकीय कारकिर्दित लोककल्याणकारी, आव्हानात्मक कामे करण्यासाठी संधी येत असते आणि ती संधी पुणे महानगरपालिकेसारख्या अग्रगण्य स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून मला मिळाली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून जगात आणि देशात अचानकपणे कोविड-१९ या संसर्गजन्य विषाणूचा प्रादूर्भाव झाला. या संसर्गजन्य आजारावर जगात कोठेही ठोस औषध किंवा लस उपलब्ध नसल्यामुळे आपल्या देशातही या महामारीचा प्रादूर्भाव झपाटयाने पसरत होता. तातडीची उपाययोजना म्हणून केंद्र व राज्य शासन स्तरावर संपूर्ण देशात अत्यावश्यक सेवा वगळून लॉकडाऊन घोषित करण्यात आला व देश एका क्षणात संपूर्णपणे थांबला. लोकांच्या सार्वजनिक ठिकाणी वावरण्यावर, दैनंदिन व्यवहारावर बंधने घालण्यात आली आणि या परिस्थितीला आपण गेल्या ७ ते ८ महिन्यापासून सामोरे जात असून, आता आपण या लॉकडाऊनच्या परिस्थितीतून हळूहळू बाहेर पडत आहोत.

पुणे शहरामध्येही या संसर्गापासून बाधित होणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. शहरामध्ये शासकीय, महानगरपालिका व खाजगी हॉस्पिटल्स् यांची संख्या पाहता आरोग्य विषयक काही तातडीच्या सुविधा मोठयाप्रमाणात उपलब्ध करुन द्याव्या लागत होत्या. साहजिकच पुणे महानगरपालिकेची संपूर्ण प्रशासकीय व आरोग्य यंत्रणा युध्दपातळीवर या संसर्गजन्य प्रादूर्भावावर मात करण्यासाठी अहोरात्र शर्तीचे प्रयत्न करीत होती. केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश व सूचनांप्रमाणे आरोग्य विषयक सोयीसुविधा नागरिकांना देण्याचे प्रयत्न प्राधान्याने पुरविण्याचे काम पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आले. तसेच महापालिकेने बाणेर याठिकाणी सी.एस.आर. च्या माध्यमातून महापालिकेच्या सहा मजली इमारतीमध्ये कोविड-१९ रुग्णांसाठी ऑक्सीजन बेड व आय.सी.यु. बेड व इतर आरोग्य विषयक सुविधेसह हॉस्पीटल सुरु केले व शहरातील ज्या ज्या ठिकाणी मनपाची रुग्णालये आहेत, त्याठिकाणीही आरोग्य विषयक तातडीच्या सोयीसुविधा देण्यात आल्या. या दरम्यान कोविड-१९ प्रार्दूभाव नियंत्रीत आणण्यासाठी आवश्यक तातडीचा निधीही उपलब्ध करुन द्यावा लागला आहे. कोविड-१९ मुळे जगाला आर्थिक संकटाचा सामना करावा लागला आहे, यास पुणे महानगरपालिका अपवाद नाही. असे असूनही सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात शहरातील चालू असलेल्या महत्वाच्या विकास कामांना गती देता आली आहे.

**सन २०२०–२१ मध्ये पुणे महानगरपालिकेची उपलब्धी –**

- सीएसआर च्या माध्यमातून पुणे महानगरपालिकेने बाणेर येथे अगदी कमी कालावधीमध्ये कोविड – १९ ने बाधीत रूग्णांसाठी एकुण ३१४ बेडस्‌चे अत्याधुनिक सोयी सुविधासह रूग्णालय सुरू करण्यात आले आहे.
- शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर यांच्या मैदानावर पुणे महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र शासन यांचे सहकार्याने ८०० बेडसचे उभारण्यात आलेल्या कोविड–१९ रूग्णालय आधुनिक सुविधांच्या सहाय्याने कार्यान्वित करण्यात आले आहे.
- विमाननगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या ४ इमारतीमध्ये ३००० बेडसचे कोविड केअर सेंटर सुरू करण्यात आले आहे.
- भामा आसखेड पाणी पुरवठा प्रकल्प पुर्ण करून तो दि. ०१/०१/२०२१ रोजी त्याचे लोकार्पण करण्यात आले आहे.

## मागील चार वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

(संख्या कोटीमध्ये)

| जमा बाजू | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर | डिसेंबर २०२० अखेर |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | ६३५.६६ | ७३.४३ | १२४.१७ | २४.८४ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ८२३.८० | ११७९.५४ | १२७६.९२ | १३७९.०७ |
| मिळकतकर | ६०७.४७ | ७५०.४१ | ८२६.६१ | ९९३.६२ |
| पाणीपट्टी | १४९.५६ | १९७.४३ | १९७.४९ | २०५.३४ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ३२९.१२ | ५५९.८७ | ५८८.९७ | २७४.९३ |
| इतर जमा | २९८.३६ | १९४.४७ | २०५.९९ | १५७.७२ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ३९.९० | ०.३० | – | २.०६ |
| शासकीय अनुदान | ७९.३९ | ९९.०२ | १२२.३६ | ६९.९० |
| कर्जरोखे | २००.०० | – | – | – |
| प्रधानमंत्री आवास योजना | – | ०.०३ | – | – |
| **एकुण रक्कम रूपये** | **३१६३.२६** | **३०५४.५०** | **३३४२.५१** | **३१०७.४८** |

(संख्या कोटीमध्ये)

| खर्च बाजू | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर | डिसेंबर २०२० अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | ११६३.२७ | १०८१.०५ | ११२६.६८ | ११३१.४४ |
| वीजखर्च व दुरूस्ती | १४३.५१ | १४९.८६ | १६९.७० | १६६.२१ |
| पाणी खर्च | १३.९८ | ५६.९४ | ५१.३७ | ३४.५३ |
| कर्जपरत फेड, व्याज व घसारा | १२.७१ | २१.०६ | २९.६१ | ३०.३४ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ६०.३५ | ७४.४२ | १०१.८१ | १२०.४२ |
| देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | ३०९.३५ | ३७६.६५ | ४१५.६२ | ५२९.१८ |
| वॉर्डस्तरीय कामे | १.३३ | ४.४२ | ३.६० | ३.६१ |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे | ०.४० | ५.८६ | १२.७० | २.०४ |
| भांडवली व विकासाची कामे | ५३२.२३ | ४३५.०१ | ५३७.८३ | ८०४.८२ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ६५.०३ | ३२.९१ | १५.६६ | २५.८० |
| **एकुण रक्कम रूपये** | **२३०२.१६** | **२२३८.१८** | **२४६४.५८** | **२८४८.३९** |

## विकास योजना प्रगती आढावा :-

## (१) पाणी पुरवठा (भांडवली तरतूद र. रु.५४१.३४ कोटी + महसूली तरतूद र.रु.५९५.८७ कोटी = र.रु.११३७.२१ कोटी)

**सन २०२०-२१ चा दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- सन २०२०-२१ सालासाठी मा. स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु. ५७०.६० कोटी (र.रू. २२५.२२ कोटी सेवकवर्ग व इतर तदनुषंगिक सहित) व भांडवली कामासाठी र.रु. ५९५.२५ कोटी असे एकुण र.रु. ११६५.८५ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीचे अनुषंगाने सन २०२०-२१ सालासाठी पाणीपट्टीपोटी र.रु. २०२ कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३१/१२/२०२० रोजी पर्यत पाणीपट्टीपोटी र.रु. ५७ कोटी जमा झालेले आहे. सदर अंदाजपत्रकात पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी समान पाणीपुरवठा योजना राबविण्याकरीता मोठया प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे. पुणे शहरामध्ये १४० कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या विकसित करण्यात आल्या आहेत व अंदाजे पाच हजार जलमापक बसविण्यात आले आहेत. या योजने अंतर्गत ८२ साठवण टाक्या बांधणे, १८०० कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकणे व ३.१५ लक्ष जलमापक बसविणे अंतर्भूत आहे.

**सन २०२०-२१ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नावीन्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे ठळक बाबी**

- पुणे शहरासाठी पाण्याची सन २०४७ सालची गरजा लक्षात घेऊन संपूर्ण शहरास तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करणेसाठी ८२ साठवण टाक्या उभारणे प्रस्तावित आहे. यापैकी सध्या ३१ साठवण टाक्यांची कामे पूर्ण झाली असून, माहे मार्च २०२१ पर्यत एकूण ८२ टाक्यांपैकी किमान ५० साठवण टाक्यांची कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी सुमारे ३०० कि.मी. लांबीची जलवाहिनी माहे मार्च २०२१ पर्यत पूर्ण करणे व ४० हजार मीटर बसविणेचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत गणेशनगर तसेच भिमनगर, म्हस्केवस्ती, सिंहगड रोड, हिंगणे बुद्रूक, संचेती परिसर, कात्रज येथील राजस सोसायटी, सुखसागरनगर या भागामध्ये ७०% मीटर बसविण्याचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच केदारेश्वर टाकीवरील केदारेश्वर पाणीपुरवठा व महादेवनगर टाकीवरील पाणीपुरवठा झोन मधील कामे पूर्ण करण्यात आली आहेत. पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी असलेला प्रकल्प भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याची योजना सन २०२०-२१ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे, यामुळे पुणे शहराच्या पूर्व भागातील वडगांवशेरी, खराडी, चंदननगर, विमाननगर, कळस, धानोरी इत्यादी भागाची पाणी समस्या पूर्णपणे सोडविणे शक्य आहे. सदर योजनेसाठी मे.केंद्र शासनाचे जेएनएनयुआरएम टप्पा क्र. २ अन्वये मान्यता मिळालेली आहे.
- **सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती.**
- सन २०२०-२१ सालासाठी महसूल तरतूद र.रु. ३८८.८८ कोटी (सेवकवर्ग व इतर तदनुषंगिक सहित सोडून) व भांडवली कामासाठी र.रु. ५५५.६१ कोटी असे एकुण र.रु. ९४४.४९ कोटीची मागणी करण्यात आली आहे. या अंदाजपत्रकामध्ये समान पाणीपुरवठा योजनेसाठी सुमारे र.रु. ४०१.६० कोटीची तरतूद करण्यात आलेली असून, यामध्ये ५०० कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकणे व १.५ लक्ष जलमापक बसविण्याची कामे अंतर्भूत आहेत.

**सन २०२१-२२ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना.**

- पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित एकूण ८२ टाक्यांपैकी ६५ साठवण टाक्या बांधण्याची कामे पूर्ण करुन, साठवण टाक्या कार्यान्वित करणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त सुमारे ६०० कि.मी. लांबीची नवीन वितरण व्यवस्था विकसित करणे व अंदाजे १.५ लक्ष जलमापक बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

पुणे शहरामध्ये पाणीपुरवठा करणेसाठी नियोजित १४१ झोन पैकी मार्च २०२१ अखेर साधारण १० झोन कार्यान्वीत होणार आहेत. मार्च २०२२ अखेर एकुण ५० झोन कार्यान्वीत करणारे उद्दिष्टे ठेवण्यात आलेले आहे.

**राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी प्रदुषण नियंत्रण करणे (जायका चे आर्थिक सहाय्य प्राप्त प्रकल्प)**

## सन २०२०-२०२१ (तरतूद र.रु. ८५ कोटी)

- पुणे शहराची सन २०२७ पर्यतच्या लोकसंख्या वाढीनुसार निर्माण होणारे संपूर्ण मैलापाणी शुद्धीकरण करणेसाठी राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, नवी दिल्ली यांची जपान सरकारच्या (जायका) अर्थसहाय्याने करावयाच्या र.रु.९९०.२६ कोटींच्या योजनेस दि. १४/०१/२०१६ रोजी मे. केंद्र सरकारमार्फत मंजुरी मिळाली आहे.
- सदर योजनेमध्ये प्रामुख्याने ११ ठिकाणी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे उभारणे, सुमारे ११३ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या विकसित करणे, जीआयएस/एमआयएस, स्काडा यंत्रणा उभारणे, कम्युनीटी टॉयलेट ब्लॉक उभारणे इ. अशा एकुण १३ पॅकेजेसच्या कामांचा समावेश आहे.
- प्रकल्पातील पॅकेज क्र. १ अंतर्गत बाणेर भागातील सुमारे १८.६० कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या विकसित करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- परंतु पॅकेज क्र. ३, ४, ५, ६ व ८ यांचे निविदा जादा दराने प्राप्त झाल्याने रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच नव्याने एकच निविदा मागविण्यासाठी केंद्र सरकारची मान्यता प्राप्त झाल्याने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत र.रु. ३९.२५ कोटी इतका खर्च झालेला आहे.

## सन २०२१-२२ (तरतूद र.रू. १४८ कोटी)

- सदर प्रकल्पातील ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे (एकूण क्षमता ३९६ एमएलडी) तसेच सुमारे ७० कि.मी.लांबीच्या मुख्य मलवाहिन्या विकसित करण्यासाठी एकाच पॅकेजमध्ये निविदा प्रक्रिया राबवून कामे करणेबाबत मे. केंद्र शासनाची मान्यता मिळाली असून त्यानुसार कामे सुरू करण्यात येणार आहेत.
- सदर कामे आगामी ३ वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावांमधील मलवाहिन्या व मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे विकसित करणे.**

**सन २०२०-२०२१ (तरतूद रक्कम रु. ८ कोटी)**

- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये मलवाहिन्या विकसित करणेकामी सिवरेज मास्टरप्लॅन तयार करण्यात आलेला आहे.

**सन २०२१-२०२२ (तरतूद रक्कम रु. ९० कोटी)**

- सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकामध्ये मलनिःसारण देखभाल दुरुस्ती विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या सिवरेज मास्टरप्लॅननुसार पूर्वगणनपत्रक र.रु. ५३३.५१ कोटी इतकी आहे. या कामामध्ये अपुऱ्या पडणाऱ्या मलवाहिनी बदलणे, नव्याने मलवाहिन्या विकसित करणे. तसेच मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे विकसित करणे या बाबींचा समावेश असून त्यासाठी पुढीलप्रमाणे रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| १. मैलापाणी गोळा करणे लांबी-१९६ कि.मी. | र.रु. २००.८० कोटी |
| २. अस्तित्वातील मलवाहिन्या सुव्यवस्थित करणे लांबी - २१ कि.मी. | र.रु. १६.८५ कोटी |
| ३. मुख्य मलवाहिन्या विकसित करणे लांबी - ८२ कि.मी. | र.रु. १३२.५८ कोटी |
| ४. मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे बांधणे (ठिकाणे - ६) | र.रु. १८३.०० कोटी |
| **एकूण** | **र.रु. ५३३.२३ कोटी** |

## (२) मलनि:सारण (भांडवली तरतुद र.रू. ४५४.३८ कोटी+ महसुली तरतुद र.रू २३०.८५ कोटी = एकूण र.रू ६८५.२३ कोटी)

**सन २०२०-२१**

- सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकाद्वारे मलनि:सारण देखभाल दुरूस्ती विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या कामांकरिता उपलब्ध तरतुदीनुसार ४५० मि.मी. ते ९०० मि.मी. व्यासाच्या सुमारे २० कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या बदलण्याचे व दुरूस्तीचे काम प्रस्तावित असुन सदर काम प्रगतीपथावर आहे.
- पुणे शहर व पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये मोठ्या व्यासाच्या ट्रंकलाईन विकसित करणेसाठी सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध झालेल्या तरतुदी नुसार मास्टर प्लान सर्वेक्षणाचे काम झालेले आहे.
- नाले साफसफाई, ओढ्या नाल्यातील राडारोडा उचलणे इ.कामे मलनि:सारण देखभाल दुरूस्ती विभागामार्फत सन २०२०-२०२१ या वर्षामध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे.

**सन २०२१-२२**

- सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकाद्वारे मलनि:सारण देखभाल दुरूस्ती विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या सिव्हरेज मास्टरप्लॅननुसार सन २०१७ पर्यंत अपुऱ्या पडणाऱ्या सुमारे १२० कि मी. लांबीच्या विविध व्यासाचा मलवाहिन्या बदलणेसाठी र.रू.१३१.२८ कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे. सदर सिव्हरेज ड्रिस्ट्रीक्ट नुसार एकत्रित काम केल्याने मलवाहिनी बदलणेचे कामात सुसूत्रता येणार असून मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांना प्रक्रियेसाठी मैलापाणी मोठ्याप्रमाणावर उपलब्ध होणार आहे.
- सन २०२१-२०२२ मध्ये मलनि:सारण देखभाल दुरूस्ती, नाले साफसफाई करणे करिता र.रू.५०.०५ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.
- सन २०२१-२०२२ या अंदाजपत्रकाद्वारे पावसाळी लाईन साफसफाईचे काम मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभागामार्फत करण्यात येणार आहे.

**मैलापाणी शुध्दीकरण –**

- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये दैनंदिन ७४४ एम.एल.डी. मैलापाणी तयार होते. पुणे मनपाने दोन टप्पांमध्ये एकुण ५६७ एम.एल.डी. क्षमतेची १० मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे उभारणेत आली आहेत, पैकी ९० एम.एल.डी. क्षमतेचे जुना नायडू मैलापाणी शुध्दीकरण केंद्र १९८७ साली बांधण्यात आले असुन सदर केंद्र अत्यंत जुने झालेले असल्याने ते सध्या ४० एम.एल.डी. क्षमतेने सुरू आहे. पुणे मनपा मार्फत सर्व मैलापाणी शुध्दीकरण केंद्रामध्ये दैनंदिन ५४० ते ५६० एम.एल.डी मैलापाण्यावर प्रक्रिया करून नदीमध्ये सोडले जाते.
- अस्तित्वातील पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे चालविणे व देखभाल दुरूस्तीची कामे या क्षेत्रातील अनुभवी कंपनी/ठेकेदाराकडुन निविदा पध्दतीने करण्यात येत आहे. मैलापाणी शुध्दीकरण केंद्र (STP) दररोज प्रक्रिया केलेल्या पाण्याची तपासणी मान्यताप्राप्त NABL प्रयोगशाळेमार्फत करण्यात येते व त्याचा दैनंदिन अहवाल पाण्याची गुणवत्ता मे.महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियत्रंण मंडळ (MPCB) यांनी ठरवून दिलेल्या निकषानुसार प्रकल्प निहाय तपासणीचे आकडे मनपाच्या मोबाईल ॲपव्दारे (PMC-STP) सर्व नागरिकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. मे. महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळ यांनी महाराष्ट्रातील सर्व मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांची माहिती उपलब्ध करणेसाठी sewage.ecmpcb.nic.in हे पोर्टल विकसित केले आहे. पुणे महानगरपालिकेमार्फत या पोर्टलवर मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांशी संबंधित दैनंदिन सर्व माहिती अपलोड करण्यात येत आहे. याशिवाय पुणे महानगरपालिकेमधील कार्यान्वित असलेले मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांची परफॉर्मस ऑडीट NEERI (National Engineering Environmental Research Institute, Nagpur) या संस्थेमार्फत तपासणी करण्यात आली आहे.

**सन २०२०-२१**

- पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण विभागामार्फत सन २०२०-२१ मध्ये खालील महत्वाची वैशिष्टयेपुर्ण कामे करण्यात आली आहेत.
- एरंडवणे व तानाजीवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील उपसा केंद्रामधील इनलेट चेंबरमध्ये यांत्रिकी जाळया बसविण्यात आल्याने दोन्ही ठिकाणी इनलेटमध्ये येणाऱ्या पाण्यामधील कचरा काढण्यास मदत झाली आहे. त्यामुळे पंपिंग यंत्रणेत सुधारणा झाली आहे.
- बोपोडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र व बोटॅनिकल गार्डन उपसा केंद्र व कल्याणीनगर उपसा केंद्र येथे उपसा यंत्र बसविण्यात आल्याने तसेच एरिएशन झोन मधील जुने/खराब झालेले गिअर बॉक्स काढुन त्याठिकाणी नवीन गिअर बॉक्स बसविल्याने दोन्ही मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे पूर्ण क्षमतेने चालविणे शक्य झाले आहे.
- एरंडवणे व विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील सेंकडरी टँकमधील मिडीया खुप जुने झाल्याने सदर मिडीया बदलण्याचे काम चालु आहे.
- भैरोबा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील प्रायमरी व सेंकडरी क्लोरिफायर, ग्रीट क्लासिफायरचे गिअर बॉक्स बदलण्याचे काम चालु आहे.

**सन २०२१-२२**

- मे.केंद्रीय प्रदुषण नियत्रंण मंडळ (CPCB) व मे.महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियत्रंण मंडळ (MPCB) यांचे सुचनेनुसार सर्व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील इनलेट व आऊटलेट पाण्याचे नमुने तपासण्यासाठी ऑनलाईन यंत्रणा बसविण्यात येणार आहे.
- तानाजीवाडी व बोपोडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील ग्रीट काढणारी यंत्रणा खुप जुनी झाली असल्याने नवीन यंत्रणा बसविण्यात येणार आहे.
- विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील ब्लोअर युनिटची सेल्फ लाईफ संपल्याने नवीन ब्लोअर युनिट बसविण्यात येणार आहेत.
- नवीन कसबा मैलापाणी उपसा केंद्र येथे नवीन उपसा यंत्र बसविण्यात येणार आहे. यामुळे सदर उपसा केंद्र पूर्ण क्षमतेने चालविण्यास मदत होणार आहे.
- भैरोबा, बोपोडी, मुंढवा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र व बोटॅनिकल गार्डन उपसा केंद्र येथे नवीन यांत्रिकी जाळया बसविण्यात येणार आहे.

## (३) घनकचरा व्यवस्थापन (भांडवली तरतूद र.रू १४५.९५ कोटी + महसूली तरतूद र.रू.५५७.५० कोटी – ७०३.४५ कोटी)

**सन २०२०-२१**

**प्रकल्पीय कामे**

- पुणे शहरातील उपनगरात निर्माण होणारा कचरा, त्याच भागात प्रक्रिया करुन जिरविण्याचे महानगरपालिकेचे उद्दीष्ट ठेवुन खालील प्रमाणे कामे करण्यात आली आहेत.
- आंबेगांव प्रकल्पा अंतर्गत २०० मे.टन, हडपसर-रामटेकडी प्रकल्पा अंतर्गत २०० मे.टन दैनांदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने प्रक्रीया करण्यास काम सुरु करण्यात आले आहे.
- केशवनगर येथील १०० मे. टन क्षमतेच्या प्रकल्पा अंतर्गत मिश्र कचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला असून यामध्ये १०० मे. टन मिश्र कचऱ्यावर प्रक्रिया सुरु करण्यात आली.

- मे. संस्कृती इंजिनियरिंग, बिबवेवाडी प्रकल्पा अंतर्गत ५० मे.टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येत आहे.
- बावधन येथील सुमारे २ एकर जागेवर मेट्रो मार्फत आधुनिक रॅम्प करणे, काम सुरु करण्यात येणार आहे.
- ऊरूळी फुरसुंगी कचरा डेपो येथे ६ एकर जागेवर शास्त्रोक्त भू-भराव करण्यात येऊन वापर सुरु करण्यात आला आहे.
- पुणे शहरातील रामटेकडी हडपसर येथे कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाचे मे. ऑरगॅनिक रिसायकलिंग सिस्टिम्स प्रा. लि., तर्फे एसपीव्ही पुणे बायो एनर्जी यांचे मार्फत उभारल्या जाणाऱ्या ७५० मे. टन प्रकल्पामध्ये माहे मार्च २०२१ अखेर कचरा विलगीकरण प्रकल्प उभारणी पूर्ण होऊन ३०० मे.टन वर प्रक्रिया करण्यात येणार आहे. याप्रमाणे अंशतः प्रक्रिया सुरू होणार आहे. तसेच डिसेंबर २०२१ अखेर सदर प्रकल्पाची उभारणी पूर्ण होऊन वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.
- ऊरूळी फुरसुंगी कचरा डेपो येथे १००० मे.टन क्षमतेचा बायोमायनिंग प्रकल्प उभारण्यात आला असून चार वर्षे मुदतीत सुमारे ९ लक्ष मे. टन जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन सुमारे २० एकर जागा मोकळी करण्यात येणार आहे. सदर २०२०-२१ चा कालावधी नोव्हेंबर अखेर सुमारे ११ एकर जागेतील ४.५ लक्ष मे. टन कचरा प्रकिया करुन जागा मोकळी करण्यात येत आहे.
- पुणे शहरातील मुख्य रस्त्यांवर यांत्रिकी पध्दतीने झाडणकाम करणे यासाठी मान्य निविदा नुसार असून शहरातील झोन १,२,३,४ याकरिता ठेकेदार यांची नियुक्ती केली असुन रस्त्याचे झाडणकाम सुरु आहे. झोन क्र. ५ करीता मनपाकडील मशीन मार्फत कुमठेकर रोड, लक्ष्मी रोड, टिळक रोड, शास्त्री रोड, शनिवार वाडा स्वारगेट ते राजीव गांधी उद्यान इ. रस्त्याची साफसफाई करण्यात येत आहे. दैनंदिन सुमारे ४०० किमी रस्त्याची साफसफाई करण्यात येते.

**कचरा प्रकल्पांसाठी अन्य खात्यामार्फत स्थापत्य विषयक कामे करणे.**

- आंबेगाव स.नं. ५१ येथील २०० मे. टनाच्या प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याचे व अन्य आरक्षण जागेचे संपादन करणेची प्रक्रिया करण्यात येत आहे.
- केशवनगर येथील १०० +५० मे.टनाच्या प्रकल्पांकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करण्यात आला.
- मलनिःसारण विभागाकडुन १० एम एल डी प्रक्रिया प्रकल्प निविदा राबविण्यात येत आहे. हडपसर- रामटेकडी येथील पुणे बायोएनर्जी प्रकल्पाकरीता २ एम.एल.डी चा प्रक्रिया केलेले पाणी उपलब्ध करून देणेत येणार आहे.
- शास्त्रोक्त भू भरावाचे काम पूर्ण करण्यात आले असुन प्रतिदिन ३५० मे. टन रिजेक्ट (प्रक्रिया न होणारे, ज्वलन न होणारे, विघटन न होणारे कचऱ्यातील घटक) घेण्यात येत आहे.

**स्वच्छ भारत अभियान २०२०**

- स्वच्छ भारत अभियान २०२० अंतर्गत शहरातील एकूण शौचालयापैकी २५% शौचालय सर्व सुविधांयुक्त बेस्ट टॉयलेट असणे आवश्यक आहे. शहरात १५ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत एकुण ३१० शौचालये निश्चित केलेली आहेत. सदर शौचालये स्वच्छ भारत अभियान मार्फत निश्चित केलेल्या मानकाप्रमाणे करण्यात आलेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने सॅनिटरी वेडिंग मशीन, एक्झॉस्ट फॅन, वॉश बेसिन सोय, नॅपकीन या सुविधांनी युक्त करण्यात आली आहेत. या कामाकरीता सुमारे र.रू. १२ कोटी क्षेत्रिय कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. यामुळे शहरातील स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे.
- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नागरिकांनी ओल्या व सुका कचरा स्वतंत्र करुन देणे अनिवार्य आहे. या करीता नागरिकांना माहिती देणे,जनजागृती करणे, सहभाग वाढविणे, मनपाकडुन विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. वस्ती पातळीवर बैठका घेणे, रेडीओ व दूरदर्शनवर स्वच्छतेचे संदेश देणे, जाहिरात फलक लावणे, सेल्फी पॉईट करणे, रिक्षा, रथ याद्वारे जनजागृती करणे या सर्व बाबींची मोहिम सुरू आहे.

## ओल्या कचऱ्यावरील नाविन्यपूर्ण प्रकल्प

- बाणेर स. नं. ४८ येथे मनपाकडुन शिल्लक ओला कचरा, अन्नपदार्थाची स्लरी करुन सुमारे १२५ मे. टन क्षमतेचा प्रकिया प्रकल्प सुरु आहे. ओल्या कचऱ्यातील स्लरी प्रवाही मिश्रण पासुन बायो सिएनजी गॅसची निर्मिती करण्यात येत असुन मनपाकडील वाहनांकरिता इंधन म्हणुन यशस्वी चाचणी झालेली आहे. सदर कॉम्प्रेस्ड गॅसचा उपयोग वाहनाचे इंधन असा करून या नाविन्यपुर्ण उपयोगामुळे महानगरपालिकेने एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे.

## सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- प्रकल्पीय कामे-
- पुणे शहरातील उपनगरात निर्माण होणारा कचरा त्याच भागात प्रक्रिया करुन जिरविण्याचे महानगरपालिकेचे उद्दिष्ट असुन त्या करीता पुढील ठिकाणी कामे करण्यात येणार आहेत.
- भूगांव व बावधन येथील सुमारे २ एकर जागा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपलब्ध झाली असुन त्या ठिकाणी यांत्रिकीकरण करुन आधुनिक रॅम्प करणे व १०० मे. टन मिश्र कचऱ्यावरील प्रकल्प प्रस्तावीत आहे.
- ऊरूळी फुरसुंगी कचरा डेपो येथे १० एकर जागेवर शास्त्रोक्त भु-भराव करणे. या कामासाठी सन २०२१-२२ या अंदाजपत्रकात सुमारे र.रू. ११ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित केलेली आहे.
- पुणे महानगरपालिका राष्ट्रीय हरित लवाद (NGT) यांना प्रतिज्ञापत्र सादर केले असून ऊरूळी-फुरसुंगी येथे डिसेंबर २०१९ पासून कचऱ्याचे शुन्य डंपिंग व सविस्तर आराखडा तयार केला आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने जानेवारी २०२० पासुन याठिकाणी ओपन डंपिंग १००% बंद केले आहे. तसेच आणखी नवीन चार कचरा प्रक्रिया एप्रिल २०२१ पर्यंत चालु होणार असून सध्या काम करत असलेल्या जुन्या कचरा प्रक्रिया प्रकल्प धारकाकडून शहरातच २१०० मे.टन कचऱ्यावर शहरातच प्रक्रिया केली जाणार आहे.

## सफाई कर अंतर्गत वापरकर्ता शुल्क-

- घनकचरा विभागास दरवर्षी मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार केल्यास आजमितीस मालमत्ता करा अंतर्गत स्वच्छता करापोटी आकारण्यात येणारे शुल्क हे एकमेव उत्पनाचे स्त्रोत आहे.
- शासनाच्या घनकचरा (व्यवस्थापन हाताळणी), नियम २०१६ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाने घनकचरा व्यवस्थापनासाठी होणाऱ्या एकुण खर्चासाठी तुलनेत त्या शहरातील नागरिकांकडून वापकर्ता शुल्क आकारणी बंधनकारक आहे व त्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणतेही स्वतंत्र अनुदान मिळू शकणार नाही. घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, कंटेनर मुक्त शहर करणे याकामासाठी र.रू. १ कोटी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार अंदाजपत्रकात संपुर्ण शहरातील ४२ प्रभागांमध्ये कचरा संकलन व प्राथमिक वाहतुक रॅम्प पर्यंत करणे असे कामकाज निविदा मागवुन करण्यात येणार आहे. यामुळे घरोघरी जाऊन वर्गीकृत कचरा संकलन करण्याचे प्रमाण सुमारे १०० टक्के पोहचविणे शक्य होणार आहे.
- शहरातील सार्वजनिक शौचालय व वस्ती पातळीवरील शौचालयाची स्वच्छता आऊटसोर्सिंग तत्वावर करण्यात येणार आहे, यासाठी २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली आहे.

## सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती

- पुणे बायोएनर्जी ७५० मे. टन प्रकल्प मार्च २०२१ पर्यत कार्यान्वित करणे.
- व्हेरीएट कन्सलंट प्रा. लि. यांचे मार्फत ३५० मे. टन प्रकल्प ऑगस्ट २०२१ मध्ये कार्यान्वित करणे.
- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता विषयक कामे करणे कचरा रॅम्प व प्रकल्प संगणकीकरण करणे/अत्याधुनिकी करण करणे.
- R O/plant /leachate / प्रक्रिया प्रकल्प अपग्रेड करणे.

**सन २०२१-२२ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प / योजना**

- नवीन २०० मे. टन प्रकल्प उरुळी देवाची येथे उभारणे.
- नवीन शास्त्रोक्त भु भराव विकसित करणे.
- NCAP च्या माध्यमातुन रोड स्वीपर व रोड स्प्रींकलर खरेदी करणे.
- बायोमायनिंग प्रकल्प क्षमता वाढविणे.
- वेस्ट टु एनर्जी प्लॅन्टसाठी आवश्यक पाण्यासाठी रामटेकडी येथे मलनिःसारण प्रकल्प उभारणे.
- चिकन व मटण वेस्ट प्रक्रियासाठी CSR माध्यमातुन नवीन तंत्रज्ञानावर आधारीत प्रक्रिया प्रकल्प उभारणे.

**सन २०२०-२१ मध्ये पुणे मनपास मिळालेले अवॉर्ड /बक्षिसे / ट्रॉफिज यांची माहिती**

- स्कॉच अॅवार्ड
- ओ डी एफ++ थ्री- स्टार - स्वच्छ सर्वेक्षण

## (४) आरोग्य (भांडवली तरतूद र.रू. २२३.९५ कोटी + महसूली तरतूद र.रु. ३५०.०८ कोटी - ५७४.०३ कोटी)

**सन २०२०-२१**

**कोरोना -१९**

- **पॉझिटीव्ह रूग्णांना दाखल करण्याकरीता कोविड केअर सेंटरची निर्मिती -**

  सुमारे ३० ठिकाणी कोविड केअर सेंटर निर्माण करण्यात येऊन सुमारे १०५०० बेडस् कार्यान्वित करण्यात आल्या होत्या व डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर व डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल येथे सुमारे ७४६६ यापैकी सुमारे १०५५ आय.सी.यु.बेडस् व सुमारे ५२१ व्हेन्टीलेटरची उपलब्धता व सर्व मिळून सुमारे १८००० बेडस्ची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे.

- **कॉन्टॅक्ट ट्रेसिंग -**

  पॉझिटीव्ह रूग्ण आढळल्याबरोबर त्याच्या घरातील व त्याच्या संपर्कात आलेल्या हाय रिस्क व लो रिस्क कॉन्टॅक्ट ना तातडीने क्षेत्रिय कार्यालय व आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांचेमार्फत नजीकच्या कोविड केअर सेंटर येथे आणून आय.सी.एम.आर. प्रोटोकॉल प्रमाणे स्वॅब घेण्यात येतो.

- **अतिजोखमेच्या नागरीकांचे सर्वेक्षण -**

  दि.७/७/२० ते १६/९/२०२० पर्यंत सदर नेमणूक केलेल्या सर्वेक्षण पथकांची १३,२१,६२८ इतक्या घरांना भेटी दिल्या असून यामध्ये एकुण ४,०२,३४३ इतक्या ६० वर्षापेक्षा जास्त वय असणाऱ्या व ज्यांना इतर व्याधी उदा. मधुमेह , उच्चरक्तदाब, अस्थमा व इतर आजार आहेत असे व गरोदर मातांचे सर्वेक्षण केले.

- **स्वॅब टेस्ट-**

  हायरिस्क कॉन्टॅक्टचा विना विलंब स्वॅब टेस्ट घेण्याकरीता हायरिस्क झोनमध्ये कोविड केअर सेंटर व्यतिरीक्त एकुण १७ ठिकाणी सॅब घेण्याची व्यवस्था करण्यात आली.

- **अॅम्ब्युलन्सची उपलब्धता-**

  कोविड रूग्णां करीता १५५ रूग्णवाहिका कार्यरत असून पुणे मनपा मार्फत शहरभर १२५ व १०८ या फोन क्रमांकावर ३० रूग्णवाहीकेंची व्यवस्था करण्यात आली होती.

- **कॉल सेंटरची स्थापना–**

  नागरिकांच्या सुविधेकरीता पुणे मनपाचे आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये नागरिकांसाठी हेल्प लाईन तयार करण्यात आली

- **बेड व्यवस्था–**

  नागरिकांच्या सुविधेकरीता पुणे मनपाच डॅशबोर्ड कक्षामध्ये हेल्प लाईन तयार करण्यात आली. तसेच येथे कोविड,नॉन कोविड रूग्णांकरीता मार्गदर्शन करण्यात येऊन कोविड रूग्णांकरीता डॅशबोर्डच्या साहयाने बेडस्च्या उपलब्धते बाबत मार्गदर्शन करण्यात येते.

- **माझे कुटुंब – माझी जबाबदारी–**

  दि.१५/९/२०२० पासून 'माझे कुटुंब – माझी जबाबदारी' ही मोहिम पुणे मनपा कार्यक्षेत्रात सुरू केली असून याव्दारे एकुण १०,०४,२५२ घरोघरी भेट देऊन ३२,०५,५३७ व्यक्तींची तपासणी केली त्यापैकी १,७८,७८२ व्याधीग्रस्त व्यक्तींची माहिती घेऊन ९०९९ यांना संदर्भीत करून त्यापैकी १६०६ रूग्ण पॉझिटीव आले. याकरिता १००५ पथके तयार केली असून एकुण २०१० सर्वेअर कार्यरत आहेत सदर मोहिम दोन टप्प्यामध्ये राबविली गेली.

- **पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना सन २०२०–२१**

  सन २०१९–२० या आर्थिक वर्षात पुणे शहरातील निवासी मिळकत करदात्यांसाठी पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना राबविण्यात आलेली होती. या योजनेता मिळकतधारक व ग.व.नि. सेवा शुल्क भरणाऱ्या नागरीकांची संख्या ६,७८,०९० एवढ्या करदात्यांना रक्कम रुपये ५ लाखापर्यंत विमा कवच देण्यात आले होते. एप्रिल २०१९ ते आजतागायत २७ जणांना अपघाती विम्याचा लाभ प्रत्येकी र. रु. पाच लाख रुपयाप्रमाणे र. रु. १,३५,००,०००/– पर्यंत विमा रक्कम अदा करण्यात आलेले आहे.

  पुणे महानगरपालिकेच्या सन २०२०–२१ या आर्थिक वर्षातील निवासी मिळकत कर भरणाऱ्या मिळकतकर धारकांना ग.व.नि. विभागाकडील सेवाशुल्क भरणाऱ्या कुटुंबासाठी खाली नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे सदर विमा योजनेचा लाभ मिळणार आहे.

- मिळकतधारकाचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला ५ लाख रुपये.
- मिळकतधारकाच्या पत्नीचा/पतीचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला ५ लाख रुपये.
- मिळकतकर धारकावर अवलंबून असलेल्या २३ वर्षांखालील पहिल्या दोन मुलांस अपघाती मृत्यू आल्यास त्याच्या कुटुंबाला मूळ विमा रकमेच्या ५०% म्हणजे दोन लाख पन्नास हजार रुपये.
- मिळकतकर धारकाच्या पालकांसाठी आई–वडील यांना अपघाती मृत्यू आल्यास मूळ विमा रकमेच्या ५०% म्हणजे दोन लाख पन्नास हजार रुपये.
- कुटुंबातील व्यक्तीला कुठल्याही प्रकारचा अपघात झाल्यास कुटुंबातील सर्वांना मिळून किंवा एका व्यक्तीला एका वर्षामध्ये जास्तीत जास्त एक लाख रुपये दवाखान्यात असतानाचा औषधांचा व दवाखान्याचा खर्च देण्यात येईल.
- वरील पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण एका कुटुंबातील सर्वांना मिळून किंवा एका व्यक्तीला वर्षातून एकदा वापरता येईल. तसेच रुग्ण वाहिकेसाठी रुपये तीन हजार देण्यात येतील.
- अपघाताने पुर्णत: कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास मूळ विमा रकमेच्या १००% म्हणजे रु. पाच लक्ष.
- कुटुंबातील व्यक्तीला अपघाताने अंशत: कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास IRDA च्या नियमांप्रमाणे व ससून सर्वोपचार रुग्णालयाने दिलेल्या अपंगत्वाच्या प्रमाणानुसार लाभ.
- मिळकतकर धारकास दिव्यांग मुल असेल व सदर दिव्यांग मुलास अपघाती मृत्यू आल्यास मूळ विमा रकमेच्या ५०% (दिव्यांग मुल ५०%) म्हणजे दोन लाख पन्नास हजार रुपये (दिव्यांग मुलास वयाची अट नाही.)

- मिळकतकर धारकावर जर त्यांची घटस्फोटित मुलगी अवलंबून असेल तर तिला अपघाती मृत्यू आल्यास मूळ विमा रकमेच्या ५०% म्हणजे दोन लाख पन्नास हजार रुपये (घटस्फोटित मुलीस वयाची अट नाही.)
- मिळकतकर धारकावर जर त्यांची अविवाहीत मुलगी अवलंबून असेल व जर तिला अपघाती मृत्यू आल्यास मूळ विमा रकमेच्या ५०% म्हणजे दोन लाख पन्नास हजार रुपये (अवलंबून असलेल्या अविवाहित मुलीस वयाची अट नाही.)
- भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाच्या अनुषंगाने ट्रस्ट स्थापन करण्यास दिनांक २६/०५/२०२० रोजी मे. महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे.

**सन २०२१–२२**

- **पुणे म.न.पा. क्षेत्रात कोव्हिड–१९ प्रादुर्भाव रोखणेसाठी संभाव्य दुसरी लाटेची पुर्वतयारी –**
- कोव्हिड – १९ प्रादुर्भाव :– मागील सात महिन्यात पुणे म.न.पा. क्षेत्रातील एकुण १,६५,४२६ कोरोना बाधीत झालेल्या रुग्णांपैकी १,५६,६३९ (९४.६९%) इतके रुग्ण बरे झालेले आहेत. तसेच ४४०१ कोरोना बाधीतांचा मृत्यू झाला आहे.
- मा. मुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र शासन व वैद्यकिय तज्ञांनी पुण्यात कोरोनाची दुसरी लाट येण्याची संभवना वर्तविली आहे. कोरोना विषयक सुरक्षेच्या सुचनाचे उल्लघन केल्याचे परिणाम युरोपमधील अनेक देशात दिसून येत आहेत. त्यामुळे नागरीकांनी सोशल डिस्टन्सींग आणि मास्कचा वापर व वारंवार हाथ धुणे, सॅनिटाईज करणे या नियमांचे सातत्याने काटेकोर पालन करण्याची गरज आहे.

  या पार्श्वभूमीवर पुणे म.न.पा. क्षेत्रात पूर्ण तयारी करण्यात आली आहे.
- आजपर्यंत अद्ययावत सर्वाधिक कोव्हिड – १९ सक्रीय रुग्ण = १७७८१
- भविष्यात अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास – १.१० च्या पटीत सर्वाधिक कोव्हिड – १९ सक्रीय रुग्ण = १९५६० पर्यंत वाढण्याची शक्यता गृहीत धरली आहे.

- **कोव्हिड – १९ साठी पुणे म.न.पा. क्षेत्रात विशिष्ट पायाभूत सुविधांची आवश्यकता व उपलब्धता :**
- **पुणे मनपाची बेडस् उपलब्धतेबाबत तयारी –**

  अंदाजीत वाढ होणा–या रूग्णांची संख्या –१९५६०, होम आयसोलेशन – ७८२४, कोविड केअर सेंटर आवश्यक बेडस् –८८०२ उपलब्ध बेडस –१००००, ऑक्सिजन आवश्यक बेडस २९३४ उपलब्ध बेडस् ५०५०, साधे ऑक्सिजन आवश्यक बेडस – २३४७ उपलब्ध बेडस् – ३९९५, आय.सी.यु. आवश्यक बेडस – ५८७ उपलब्ध बेडस् १०५५ , आय.सी.यु.आणि व्हेन्टीलेटर आवश्यक बेडस –२९४ उपलब्ध बेडस् ५३४ , आय.सी.यु. नसलेले व्हेन्टीलेटर आवश्यक बेडस – २९३ उपलब्ध बेडस् ५२१

**आरोग्य सेवा व सुविधा –**

- स्वॅब सेंटर – एकूण १८ सेंटर
- प्रयोगशाळा तपासणी– शासकिय– ३ व खाजगी– १६
- नमुना तपासणी क्षमता (शासकिय) ३११५ प्रतिदिन
- तपासणी प्रकार– RTPCR आणि RAT
- कोविड केअर सेंटर– ३०
- वैद्यकिय साधन सामुग्री पुरेशी उपलब्ध आहे.
- आवश्यक औषधे पुरेशी उपलब्ध आहे.
- कोव्हिड– १९ आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध.

- **भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय**
- पुणे शहरातील विविध भागांत वास्तव्यास असणाऱ्या नागरीकांसाठी उपलब्ध करावयाच्या वैद्यकीय सुविधे संबंधित भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय प्रस्तावित आहे. सदर वैद्यकीय महाविद्यालय डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय, स्टेशन रोड या ठिकाणी उभारण्यात येणार असुन सदरचे वैद्यकीय महाविद्यालय ट्रस्ट फॉर्मेशन (वैद्यकीय शिक्षण ट्रस्ट स्थापन करणे ) या करीता दिनांक-२६/०५/२०२० रोजी मे.महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाली आहे.
- दिनांक-१३/०८/२०२० रोजी पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्ट (पी.एम.सी.- एम.ई.टी.) विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी एफ-५४४५९/पुणे नोंदणीचे प्रमाणपत्र प्राप्त झाले असुन दि.२५/११/२०२० रोजी DMER यांचे कडुन ESSENTIALITY CERTIFICATE व दिनांक-२८/११/२०२० रोजी MUHS नाशिक यांचेकडुन AFFILIATION CONSENT प्राप्त झाले आहे.
- NMC यांना प्रथम वर्ष चालु करणेकरीता रविवार दिनांक-२९/११/२०२० रोजी अर्ज सादर करण्यात आला असुन या सालामध्ये प्रथम वर्षामध्ये १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे.
- **जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्याने कत्तलखान्याचे आधुनिकीकरण करणे**
- जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्याने कोंढवा येथील शेळी व मेंढी यांच्या कत्तलखान्याचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे (APEDA STANDRAD) च्या धर्तीवर आधुनिकीकरण करण्यासाठी पुणे महानगरपालिकेस र. रु. ७ कोटी १००% अनुदान हप्त्याहप्त्याने प्राप्त होणार आहे. सदर प्रकल्पा अंर्तगत पुणे शहरातील नागरीकांना उत्तम दर्जाची मांस मिळेल. तसेच पुणे शहरातील अनाधिकृत होत असलेल्या मांस कटाईस प्रतिबंध होईल. सदर प्रकल्प कार्यान्वित होण्यापुर्वी जागतिक बॅंकेच्या निर्देशाप्रमाणे PPP तत्वावर चालविण्यास देण्यात येईल त्यासाठी प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रकीय तरतूद सुचविण्यात आली आहे.

## (५) <u>नगर नियोजन</u>

**सन २०२०-२१**

- **सन २०२०-२१ मधील महत्त्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविण्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे, ठळक बाबी**
- **शहर अभियंता कार्यालय डि.पी. मार्कींग व इतर योजना सन २०२०-२१ साठीची तरतूद र.रु.१.८०कोटी**
- पुणे शहराचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्यामध्ये विविध डि.पी. रस्ते व आरक्षणे नियोजीत करण्यात आलेली आहेत. विकास आराखड्यामधील डि.पी. रस्ते यांचे विकसन महानगरपालिकेच्या पथ विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच सार्वजनिक हितासाठीचे आरक्षणे विकसन करणे ही पुणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे. सदर डि.पी. रस्त्याची हद्द व आरक्षणे आखणी निश्चित करणेबाबत तसेच प्रत्यक्ष जागेवर डि.पी. रस्त्यांचे मार्कींग करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. अशारितीने जागेवर आरक्षणाची हद्द निश्चित झाल्यास तेथे अतिक्रमण होऊ शकणार नाही. तसेच रस्त्याचे व आरक्षणाचा ताबा व विकसन करणेही पुणे महानगरपालिकेस सुलभ होणार आहे.
- **नगर रचना परियोजना (टि.पी. स्कीम) -**
- पुणे महानगरपालिका हद्द व समाविष्ट २३ गावे या ठिकाणी नवीन टि.पी. स्कीम राबविण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी मे. केंद्र शासनाने अमृत योजने अंतर्गत प्रायोगिक तत्वावर देशभरात २५ शहरांची निवड केलेली असून त्यामध्ये पुणे शहराचा समावेश आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांपैकी फुरसुंगी व उरूळी देवाची या दोन गावांमध्ये प्रायोगिक तत्वावर तीन टी.पी. स्कीम राबविण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. या माध्यमातून ११० मी. बाहयवळण रस्त्याची जागा कोणतेही भूसंपादन न करता ताब्यात मिळणार आहे. तसेच, नगर रचना परियोजना राबविल्यास त्या ठिकाणच्या सोयीसुविधासाठी आवश्यक जागा, अंतर्गत रस्ते महानगरपालिकेच्या ताब्यात येऊन या भागाचा सुनियोजीत विकास होणार आहे. सन २०२०-२१ मध्ये पहिल्या टप्प्यातील र.रू. ४० लाख अनुदान प्राप्त झाले आहे. दुसऱ्या टप्प्याचे

र.रु. ८० लाख केंद्र सरकारकडून मंजूर झाले आहेत. सदर टी.पी. स्कीम करीता तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली असून सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे. भूमी अभिलेख विभाग व तहसिलदार यांचेशी समन्वय साधून ७/१२ उतारे संकलीत करण्यात आलेले असून मोजणी संबंधीचे रेकॉर्ड अद्ययावत झाले आहे.

- **११ गावांचा प्रारुप विकास आराखडा**
- विद्यमान जमीन वापर नकाशा व अहवाल तसेच एम. आर. टी. पी. ॲक्ट १९६६ चे कलम २६ अन्वये प्रारुप विकास आराखडा तयार करुन नागरिकांच्या हरकती व सूचना मागविणेकरिता प्रसिध्द करण्यात येणार आहे. विकास आराखड्याची संपूर्ण वैधानिक प्रक्रिया पूर्ण करुन सदरचा प्रारुप विकास आराखड्यास मा. मुख्य सभेची मान्यता घेऊन मे. शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात येणार आहे.

**सन २०२०-२१ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/ सुरु असलेल्या नाविण्यपुर्ण योजना/प्रकल्पांची नावे ठळक बाबी**

- मौजे खराडी स.नं.५७/५ (पै.) येथील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी ७८६ सदनिकांचा प्रकल्प.
- मौजे हडपसर स.नं.१०६अ हि.नं.१६(पै.)+१७(पै.)+ १८(पै.) येथील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी ३४० सदनिकांचा प्रकल्प.
- मौजे हडपसर स.नं.१०६अ हि.नं.१२ (पै.)+१३(पै.) येथील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी १०० सदनिकांचा प्रकल्प.
- मौजे हडपसर स.नं.८०(पै.) +९२(पै.) येथील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी ५८४ सदनिकांचा प्रकल्प.
- मौजे वडगाव खु. स.नं.३९(पै.) +४०(पै.) येथील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी ११०८ सदनिकांचा प्रकल्प.

**सन २०२१-२२ मधील करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प / योजना**

- **नगररचना परियोजना (टि.पी. स्कीम)**
- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांपैकी फुरसुंगी व देवाची उरुळी या दोन गावांमध्ये टि.पी.स्कीमच्या प्रारुप आराखड्याचे काम सुरु आहे. सदर प्रारुप योजना मे. शासनाकडे सादर करणेत येणार आहे. सदर योजना राबविल्यामुळे ११० मी. बाह्यवळण रस्ता ताब्यात घेणे व लगतच्या भागाचा सुनियोजीत विकास शक्य होणार आहे.
- पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच भविष्यकालीन आढावाकरिता लोकसंख्या, सामाजिक, आर्थिक विश्लेषण या करिता गोखले इन्स्टिट्युटस ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेची नेमणूक केलेली आहे. समाविष्ट ११ गावांचे हद्दी दर्शविणारा नकाशा जाहीर प्रकटनासह प्रसिध्द करणेत आलेला आहे. त्यातूनच विद्यमान जमीन वापर नकाशा पुणे महानगरपालिकेमध्ये तयार करण्यात येत आहे.
- **सन २०२१-२२ चा दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती-**
- प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना परवडणारी घरे देण्याचे उद्दीष्ट पुर्ण करण्यासाठी हडपसर, खराडी व वडगाव खु.येथे एकूण ६२६४ पैकी एकूण २२३४ सदनिकांचे बांधकाम प्रत्यक्ष सुरु करण्याचे नियोजन आहे. (र.रु.१०० कोटी) तरतुद.
- प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देणेसाठी मौजे खराडी येथे ७८६, मौजे हडपसर येथे १०२४ व मौजे वडगाव खु. येथे ११०८ असे एकूण २९१८ सदनिकाचे बांधकाम सुरु करण्यात आले असून दि.२४/१०/२०२० रोजी ऑनलाईन सोडत पध्दतीने नागरिकांना घरकुलाचे वाटप करण्यात आले आहे. सोडतीमधील विजेत्यांकडून त्यांचे स्वहिश्याची १०% रक्कम पुणे महानगरपालिकेकडे भरण्यास सुरुवात झाली आहे. मे. केंद्रशासन व राज्यशासनाकडून अनुक्रमे र.रु. १.५ लक्ष व र.रु. १ लक्ष रुपयांचे प्रति सदनिका अनुदान मिळणार आहे.

- प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना परवडणारी घरे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात खाजगी भागीदारी तत्वावर प्रकल्प राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सदरच्या जागा बाणेर, बालेवाडी, कोंढवा बुद्रूक, धानोरी, महमदवाडी, फुरसुंगी या ठिकाणी सदर प्रकल्पातंर्गत २८०३ सदनिका या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना उपलब्ध करण्याचे नियोजित असून पुढील २ ते ३ वर्षात सदनिकांचे बांधकाम पूर्ण होऊन नागरिकांना घरे देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न राहील.
- **सन २०२१-२२ ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट प्रकल्प -**
- नॅशनल टिओडी पॉलिसी नुसार मान्य विकास नियंत्रण नियमावली - २०१७ मध्ये नॅशनल टिओडी पॉलिसी अंतर्भूत करण्यात आली आहे. त्यानुसार प्रभाव मुल्यांकन अभ्यास (इम्पॅक्ट असेसमेंट) करणेबाबत तरतूद आहे. त्यामध्ये मेट्रो स्टेशन हद्दी पासून ५०० मी. अंतरा पर्यंत २ ते ४ चटई क्षेत्र निर्देशांक प्लॉटचे क्षेत्रानुसार व प्लॉट समोरील रस्त्याचे रूंदीनुसार संबंधीतांना मिळणार आहे. तसेच टीओडी झोन मधील रहिवासी तसेच शासकिय व निमशासकीय क्षेत्राकरिता पार्किंगमध्ये सवलत मिळणार आहे.
- प्रभाव मुल्यांकन अभ्यास करणे करिता (इम्पॅक्ट असेसमेंट) निविदा मागविण्यात आल्या होत्या. भारत सरकारचे अंगीकृत तज्ञ सल्लागार मे.अर्बन मास ट्रान्सपोर्ट कंपनी लि. यांचे मार्फत इन्पॅक्ट असेसमेंट स्टडी करणेत येत आहे. यामध्ये पुनर्विकास एकत्रीकरण, रिअल इस्टेट संभाव्यता आणि बाजार विश्लेषणाचे मुल्यांकन करणे, सार्वजनिक सुविधा, भौतिक पायाभूत सुविधा, रहदारी आणि पर्यावरणावर मेट्रो कॉरिडोरच्या बाजूने प्रस्तावित वाढीव एफएसआयच्या परिणामाचे मुल्यांकन करणे, मुल्यांकन आधारे आवश्यक शमन उपाय आणि शिफारशी कालांतराने कृती योजनेसह सादर करणेत येणार आहे.

## (६) वाहतूक नियोजन व प्रकल्प (भांडवली तरतूद र. रु. ६२०.९० कोटी + महसूली तरतूद र.रु. ३०.०५ कोटी = र. रु. ६५०.९५ कोटी)

- **सन २०२०-२१**
- सार्वजनिक वाहतुक व्यवस्था व विशेष प्रकल्प या अर्थशीर्षकांतर्गत सन २०२०-२१ मध्ये नदीपुनरुत्जीवन प्रकल्प, वाहनतळ विकास व सुधारणा, उड्डाणपूल, नदीवरील पुल, भुयारीमार्ग इ. प्रकल्प सुरु आहेत. तसेच चालू आर्थिक वर्षात सुरू असलेल्या उडड्डाणपूलांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे .
- **सन २०२०-२१ मधील पूर्ण/पूर्णत्वास आलेले प्रकल्प/योजना-**
- **लुल्लानगर कमांड हॉस्पिटल (MH- CTC) ते न्यू कमांड हॉस्पिटल यांना जोडणारा अंडरपास तयार करणे -** सदरचा अंडरपास पूर्ण करुन संरक्षण विभागास ताब्यात दिला आहे. त्याकरीता र. रु. ४.६० कोटी इतका खर्च आला आहे.
- **बालेवाडी स.नं. ४६/४७ जवळ मुठा नदीवर पुल बांधणे -** सदर कामाचे पुणे मनपा हद्दीकडील बाजूच्या ॲप्रोच रस्ता व पुलाचे काम पूर्ण करणेत आले आहे. पिंपरी चिंचवड बाजूकडील उर्वरीत एक स्पॅन व ॲप्रोच रस्त्याचे काम सुरु असून सदरचे काम दि. ३१/०३/२०२१ पर्यंत पुर्ण करणेचे नियोजन आहे.
- **मुंढवा येथे मुळा मुठा नदीवरील जुन्या पुलाची दुरुस्ती करणे व तद्नुषंगिक कामे करणे -** या कामात पुलाचे गर्डर, बेअरींग व एक्सपांशन जॉईंट इ. बाबींची दुरुस्ती केल्याने पुलाचे आयुष्य वाढले आहे.
- **पी.एम.पी.एम.एल. च्या विविध डेपोंमध्ये विकसनाची कामे करणे -** भेकराईनगर व सुतारवाडी येथील बस डेपो विकसित करणेचे काम पूर्णत्वास आले आहे.
- **सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक उड्डाणपुल बांधणे -** सदचे काम सुमारे ७५% पूर्ण झाले असून जून २०२१ अखेरपर्यंत सदर पुल वाहतूकीस खुला करणेचे नियोजन आहे.
- **घोरपडी पुणे येथे पुणे सोलापूर व पुणे- मिरज रेल्वे लाईनवर उड्डाणपुल बांधणे -** थोपटे चौक घोरपडी येथे पुणे-सोलापूर रेल्वे लाईनवर उड्डाणपुलाचे काम सुरु असून सुमारे १०% पूर्ण झाले आहे.

- **पुणे- मिरज रेल्वे लाईनवरील रामटेकडी व काळेपडळ रेल्वे फाटक येथे विकसित करणेत आलेल्या भुयारी मार्गाच्या पोहोच रस्त्याचे काम करणे –** काळेपडळ येथील रविपार्क येथील पूर्ण झालेल्या भुयारी मार्गाचे पोहोच रस्त्याचे काम सुरु केले असून मार्च २०२१ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे.
- **नळस्टॉप चौकात उड्डाणपूल बांधणे** – वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गिकेवर नळस्टॉप चौकात महामेट्रोसोबत उड्डाणपूल बांधणेत येत आहे. उड्डाणपूलासाठी र.रु. ३५.२५ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना महानगरपालिकेकडून टप्प्याटप्प्याने अदा करणेत येणार आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असून ३०% इतके काम पूर्ण झाले आहे.
- **औंध वाकड/सांगवी रस्त्यावरील अस्तित्वातील पुलाशेजारी नव्याने पुल बांधणे –** सदरचा प्रकल्प पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असून नवीन पुलासाठी येणारा खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिका ५०% व पुणे महानगरपालिका ५०% अशा पध्दतीने करणेत येणार आहे. सदर काम प्रगतीपथावर असून दि. ०७/०२/२०२२ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
- **गोल्फ क्लब चौक येरवडा येथे उड्डाणपूल बांधणे –** सदरचे काम प्रगतीपथावर असून २४% काम पूर्ण झालेले आहे. मार्च २०२२ अखेर काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.
- **मुंबई-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण- सुस येथे उड्डाणपूल बांधणे –** मुंबई-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण- सुस येथील वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून उड्डाणपुल बांधणेचे नियोजन करण्यात आलेले आहे. या कामाचे पुर्वगणनपत्रक र.रु. ४५ कोटी इतके आहे. सदरहू कामाकरीता अडीच वर्षाचा कालावधी लागणार असून जागेवर ४५% इतके काम पुर्ण झाले आहे.
- **राजाराम पुल येथे बंडगार्डन आर्ट प्लाझाच्या धर्तीवर पेडेस्ट्रीयन प्लाझा विकसित करून सुशोभिकरण करणे –** राजाराम पुलाच्या अप स्ट्रीप बाजुला नदीपात्राचे भागात पेडेस्ट्रीयन प्लाझा तयार करण्याचे नियोजन आहे. जागेवर काम सुरू असून प्रत्यक्षात १००% इतके काम पूर्ण झाले आहे.
- **जुन्या पुलांची दुरूस्ती करणे –** या कामांतर्गत बंडगार्डन व निलायम टॉकीज या दोन पुलांची दुरूस्ती पूर्ण केली आहे.
- **पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ विकसित करणे/बांधणे –** या कामांतर्गत वडगाव शेरी, पुण्यनगरी सोसायटी शेजारी व कोंढवा, ईस्कॉन मंदिर शेजारी या ठिकाणी वाहनतळ विकसित करण्याचे काम सुरु आहे.

**सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक –**

- सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व विशेष प्रकल्प या अर्थशिर्षकांतर्गत चालू वर्षातील नदीपुनरुत्जीवन प्रकल्प, वाहनतळ विकास व सुधारणा, भूयारीमार्ग तसेच पुल/उड्डाणपूलांची कामे प्रगती पथावर असून सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नव्याने काही कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत आणि सद्यस्थितीत सुरु असलेली कामे मार्गी लावण्याचे अनुषंगाने तरतूद सुचविणेत आली आहे.

**सन २०२१-२२ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- **विश्रांतवाडी येथे पुणे मनपा व राष्ट्रीय महामार्ग योजने अंतर्गत संयुक्तपणे उड्डाणपूल उभारणे –** सदरच्या कामासाठी तज्ञ सल्लागार यांची नियुक्ती करणेत आली असून पुर्वगणनपत्रक तयार करण्यात येत आहे.
- **कल्याणीनगर ते कोरेगाव पार्क जोडणाऱ्या पुलाचे** (H H Agakhan Bridge) रुंदीकरण करणे- सदर कामाचे पुर्वगणनपत्रक मान्य असून निविदा प्रक्रिया सुरु आहे.
- **सिंहगड रोड येथे नवीन उड्डाणपूल बांधणे-** वडगाव, नऱ्हे, वडगाव धायरी, खडकवासला, इ. भागाला पुणे शहराशी जोडणारा सिंहगड रस्ता हा एकमेव रस्ता असल्याने या रस्त्यावर वाहतूकीचा मोठया प्रमाणात ताण येतो. सदरचा ताण कमी करणेसाठी सिंहगडरोड येथे उड्डाणपुल प्रस्तावित करणेत आलेला आहे. सदर कामासाठी र.रु. १२० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

- **इलेक्ट्रॉनिक बस (जी.सी.सी. मॉडेल)विकत/पीपीपी इत्यादी धर्तीवर बस उपलब्ध करुन देणे –** पीएमपीएमएल यांचे कडून सुरु असणाऱ्या निविदा प्रक्रियेसाठी र. रु. ५० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

- **नदी पुनर्जिवन प्रकल्प राबविणे –** मुळा, मुठा, मुळा-मुठा या ४४.४ किमी नद्यांचे पुनर्जिवन या प्रस्तावित प्रकल्पास Environment Clearance प्राप्त झाले असून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात पुढील प्रमाणे कामे करण्याचे नियोजन आहे व याकरीता र.रु. १५० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

  - नदीशी संलग्न असलेल्या विविध विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे
  - सदर प्रकल्प राबविणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड यांची मान्यता घेणे
  - नदी पुनरुत्जीवन प्रकल्पासाठी शासन मान्यतेनंतर विविध संस्था मिळून एस.पी.व्ही. स्थापन करणे.
  - प्रकल्प उभारणीसाठी फायनान्शीयल मॉडेल तयार करणे.
  - एस.पी.व्ही. स्थापन झाल्यानंतर या प्रकल्पातील फेज १ चे डिटेल इंजिनिअरींग ड्रॉईंग, एस्टीमेट तयार करणे.

- **खराडी बायपास चौक येथे उड्डाणपूल / ग्रेड सेपरेटर बांधणे –** सदर कामासाठी तज्ञ सल्लागार नियुक्ती व प्री टेंडर ॲक्टीव्हीटी इ. बाबी पूर्ण झाल्या आहेत. या कामासाठी र.रु. २० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

- **पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प –** सदरचे काम महामेट्रो विभागामार्फत सुरु असून त्यासाठी र.रु. ५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

- **राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ४ वरील चांदणी चौकातील रस्त्यांचे एकात्मिक विकसनाबाबत –** सदर कामांतर्गत युटीलिटी शिफ्टींगबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण , विदयुत विभागाकडून चालू आहे. झाडे तोडणे व वृक्षारोपण करणे तसेच पाणीपुरवठ्याचे लाईन टाकणेचे काम NHAI मार्फत करणेत येणार असून त्यास महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्याचा ठराव मा. स्थायी समिती मध्ये मान्य झाला आहे. सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु. ७ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

- **साधू वासवानी पुल (कोरेगाव पार्क) ते बंडगार्डन पुलापर्यंत एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करुन तद्नुषंगिक कामे करणे –** सदर पुलाचे पुनर्निमाण कामासाठी र.रु. १० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आली आहे.

- **बोपोडी सांगवी मुळा नदीवर पुल बांधणे –** सदरचा प्रकल्प पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार असून सदरचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे. सदर कामासाठी दोन्ही महानगरपालिकेचा ५०-५० टक्के इतका खर्च असणार आहे. सदर कामासाठी सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात र.रु. १० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

- **करिश्मा चौक ते कर्वे पुतळा उड्डाणपूल बांधणे –** सदर चौकातील वाढत्या वाहतूक समस्या सोडविणेकरीता उड्डाणपूलाचे नियोजन करणेत आले आहे. या कामाकरीता सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु. १० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

- **नगर रस्त्यावर रामवाडी भुयारी मार्ग येथे दुरुस्ती व तद्नुषंगिक कामे करणेबाबत –** सदरच्या भुयारी मार्गातील पाणी गळती थांबविणे करीता र.रु. १ कोटी इतकी तरतूद सुचविण्यात आली आहे.

- **शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर येथे उड्डाणपूल बांधणे अंतर्गत, उड्डाणपूलांवर ध्वनीरोधक बसविणे व अभियांत्रिकी कॉलेज हॉस्टेल ते कॉलेज मैदान यांना जोडणारा पादचारी पुल बांधणे –** कॉलेज ऑफ इंजिनिअरींग येथे उड्डाणपूल बांधणे या अंतर्गत शासकीय महाविद्यालय येथे ध्वनीरोधक बसविणे, जिना करणे इ. कामे पुणे महानगरपालिका व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांचेमध्ये झालेल्या सांमजस्य करारनाम्यामध्ये सुचविणेत आली आहेत त्यानुसार सदर कामांसाठी र.रु. १२ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

## (७) <u>पथ (भांडवली तरतूद र. रु. ७३०.३६ कोटी + महसूली तरतूद र.रु. १९५.५७ कोटी = र. रु. ९२५.९३ कोटी)</u>

- **<u>सन २०२०-</u>२१ <u>चा दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती</u> :-** पथ विभागामार्फत विविध खोदाई पोटी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात र. रू. ६.२७ कोटी इतकी रक्कम जमा झाली असून, खात्याकडे आलेल्या खोदाई प्रस्तावांचा विचार करता माहे मार्च, २०२१ अखेर र.रु. ५० कोटी इतकी रक्कम जमा होईल.
- **सन २०२०-२१ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण योजनांचे ठळक मुद्दे -**
- **शिवणे ते खराडी रस्ता -** शहरातील वाहतूकीवरील ताण कमी करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून शिवणे ते खराडी दरम्यान नदीकाठावर दर्शविण्यात आलेल्या डी.पी.रस्त्याचे काम, शिवणे ते म्हात्रे पुल फेज-१ लांबी ६ कि.मी. व संगमवाडी ते खराडी फेज-३ लांबी ११.५० कि.मी. असे एकुण १७.५० कि.मी. लांबीचे काम प्रगतीपथावर आहे. या अंतर्गत मुंढवा पुल ते खराडी दरम्यान नवीन रस्त्याची मार्गिका लवकरच सुरू होत आहे.
- **कात्रज-कोंढवा रस्ता -** कात्रज-कोंढवा रस्ता राजस सोसायटी ते खडीमशिन चौक दरम्यान सुमारे ३.५ कि.मी. लांबीचा व ८४ मी. रूंदीचा रस्ता विकसित करण्याकरीता मा.स्थायी समिती मार्फत मंजूरी देण्यात आली असून या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असणारी जमीन टीडीआर व एफएसआय पोटी तडजोडीने ताब्यात घेण्याची कार्यवाही पथ विभागामार्फत सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ७५% जागा तडजोडीने टीडीआर पोटी ताब्यात घेण्यात आली आहे. या मार्गावर शत्रुंजय मंदिराजवळ ५०० मी. लांबीच्या ग्रेड सेपरेटरचे तसेच उपलब्ध जागेवर रस्ता विकसनाचे काम सुरू करणेत आलेले आहे.
- **बी.आर.टी.एस.प्रकल्प -** संगमवाडी ते विश्रांतवाडी व नगररस्ता या रस्त्यांवर एकुण सुमारे १६ कि.मी. लांबीकरीता बी.आर.टी.एस. योजना कार्यान्वित करण्यात आली असून सदर रस्त्यांवर बी.आर.टी. बसेसचे संचलन सुरू आहे. सिमला ऑफिस चौक ते राजीव गांधी पुल, औंध दरम्यान ६.५ कि.मी.लांबीच्या मार्गापैकी विद्यापीठ चौक ते राजीव गांधी पूल दरम्यानचे ३.२ कि.मी.लांबीचे रस्तारूंदीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच पाटील इस्टेट जंक्शन ते हॅरिस ब्रिज, बोपोडी या रस्त्यांवर सुमारे ५.७० कि.मी. लांबी पैकी पाटील इस्टेट जंक्शन ते रेंजहिल चौक दरम्यान २ कि.मी.लांबीच्या भागामध्ये रस्तारूंदीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. रेंजहिल चौक ते खडकी रेल्वे स्टेशन (लांबी २.२ किमी) खडकी कॅन्टोन्मेन्ट बोर्डाच्या अखत्यारित असून सदर जागेवर वर्कींग परमिशन मिळणेसाठीचा प्रस्ताव मे.केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाकडे पाठविण्यात आला आहे.
- पाटील इस्टेट जंक्शन पुल ते संगमवाडी गावठाण दरम्यान रस्ता रूंदीमधील जागा ताब्यात मिळाल्यानंतर सदर ठिकाणी रूंदीकरणाचे काम करण्यात येणार आहे. त्यानंतर बी.आर.टी.एस. योजनेकरीता वाहतुक पोलीस विभागाशी समन्वय साधून बसथांबे बांधणे व बी.आर.टी.एस. कॉरिडॉर तयार करणेचे उर्वरित काम हाती घेण्यात येणार आहे.
- सातारा रस्ता स्वारगेट जंक्शन ते कात्रज दरम्यान सुमारे ५.५० कि.मी.लांबीकरीता बी.आर.टी.एस. प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर असून नजिकच्या कालावधीत हा मार्ग कार्यान्वित होत आहे.
- **सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती -** पथ विभागाकडील भांडवली कामांसाठी र.रू. ७३०.३६ कोटी व महसूली कामांसाठी र.रू. १९५.५७ कोटी तसेच नवीन गावांसाठी भांडवली कामासाठीच्या रकमेचा समावेश आहे, असे एकूण र.रू. ९२५.९३ कोटी इतकी तरतूद सुचविण्यात आली आहे.

**सन २०२१-२२ मध्ये करावयाच्या प्रस्तावित योजना -**

- **पुणे महानगरपालिका सायकल क्लब -** पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सायकल क्लब स्थापन केला असून यामध्ये इतर स्वयंसेवी संस्था, नागरिक यांना देखील या उपक्रमात सामिल करून घेण्यात येत आहे. पुणे महानगरपालिका सायकल क्लबचे आजमितिस ९३५ सभासद आहेत. अनेक सामाजिक विषयाबाबत मोठया प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. पुणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणारे

विविध उपक्रम, योजना यांची जनजागृती करणे यासाठी देखील सायकल क्लबच्या माध्यमातून यशस्वीपणे प्रयत्न करण्यात येत आहे. सायकल क्लबच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविणारी पुणे महानगरपालिका ही भारतातील पहिली स्थानिक स्वराज्य संस्था आहे. सद्य:स्थितीत शहरात एकूण ९५ किमी लांबीचा सायकल ट्रॅक असून नव्याने आठ ठिकाणी १० किमी लांबीचे सायकल ट्रॅक प्रस्तावित केले आहेत.

- **लहान मुलासांठी वाहतूक विषयक प्रकल्प (Children Traffic Plaza)** – भारतामध्ये मुलांना सुमारे १८ वर्षे झाल्यानंतर टु–व्हीलर साठी लायसेन्स घेतेवेळी वाहतुकी विषयक नियमांची माहिती दिली जाते. विकसीत देशामध्ये लहान वयामध्ये मुलांना वाहतुक विषय नियम व माहिती वेगवेगळया माध्यमांमार्फत (Traffic plaza, video, Presentation, Training) दिली जाते. जेणेकरून लहान संस्कारक्षम वयामध्ये याबद्दल माहिती मिळाल्यामुळे त्याचे पालन योग्य त्या पध्दतीने होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्याअनुषंगाने पुणे मनपामार्फत अर्बन ९५ या प्रकल्पांतर्गत ब्रेमेन चौक, औंध नजीक ४०० मी X १८ मी या क्षेत्रामध्ये लहान मुलांसाठी (Children Traffic Plaza) वाहतूक विषयक माहिती देणारा पार्क उभारण्यात आलेला आहे. या परिसरातील ११ शाळामधील सुमारे ५००० विद्यार्थी या उपक्रमाचा लाभ घेऊ शकतात. पोलीस उप आयुक्त (वाहतुक) यांनीही या प्रकल्पास सहमती दर्शविली असून, पुढील वर्षी येरवडा विभागामध्ये असा प्रकल्प उभारणेचे नियोजन आहे. त्यामुळे वाहतुक विषयक नियमांचे पालन करणेसाठी समाज प्रबोधन करणेस मदत होईल.
- **पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या व प्रस्तावित नाविन्यपूर्ण योजना –**
- **पुणे स्ट्रीट प्रोग्रॅम** – पुणे स्ट्रीट प्रोग्रॅम अंतर्गत शहरातील प्रमुख वर्दळीचे रस्ते पादचारी पुरक व सुरक्षित दृष्टीकोनातून नव्याने डिझाईन करून सुधारित करण्यात येत आहेत. शहरातील जंगली महाराज रस्ता, स्वामी विवेकानंतद पथ, बिबवेवाडी हे रस्ते सद्य:स्थितीत विकसित केलेले असून, नव्याने ६ रस्ते प्रस्तावित करणेत येत आहेत.
- शहरातील प्रमुख रस्ते वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून संपूर्ण वर्षाच्या कालावधीत सुस्थितीत ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये २५ प्रमुख डी.पी. रस्ते, लेन मार्किंग, डिव्हाईडर पेन्टींग, पादचारी क्रॉसिंग, सुरक्षा फलक, इ. कामांसह सुस्थितीत ठेवण्याकरीता स्वतंत्र तरतूद प्रस्तावित केलेली आहे.
- पुणे शहरात प्रवेश करताना, प्रमुख रस्त्यांवर प्रवेशद्वार फलक व परिसर सुशोभिकरण प्रस्तावित केलेले असून एकूण ४ ठिकाणी नव्याने प्रवेशद्वारांवर माहिती फलक/सुशोभिकरण करण्यात येत आहे.
- अंदाजपत्रकात रूंदीकरणासह, नव्याने विकसित होणारे एकुण ३० किमी लांबीचे ५६ रस्ते प्रस्तावित केलेले असून त्यामध्ये रूंदीकरण, मिसिंग लिंक विकसित व पूर्णत: नव्याने विकसन करणे याचा समावेश आहे.
- माहे सप्टेंबर २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबिल ओढयाला मोठा पूर येवून जिवीत व वित्त हानी झालेली होती. या पार्श्वभुमीवर तज्ञ सल्लागारा मार्फत आराखडा तयार करण्यात येवून महत्तम पूररेषेचा विचार करून अस्तित्वातील २१ कलव्हर्ट पाडून कात्रज ते हिंगणे दरम्यान आंबिल ओढयावर नव्याने बांधण्यात येणार आहे. आंबिल ओढयावर पुरेशी वहन क्षमता निर्माण होवून पूर्ण रूंदीचे कलव्हर्ट विकसित करण्यात येणार आहेत.

- **पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल खाजगी सहभागातुन विकसीत करणे. (भांडवली तरतूद र.रू. २०० कोटी)**

शहरातील विकास आरखडयातील रस्ते ताब्यात आलेल्या जागेनुसार आणि उपलब्ध तरतुदीनुसार दरवर्षी टप्पे निहाय विकसीत करण्यात येत असतात. रस्ते विकसनाचा खर्च व तुलनेने कमी उपलब्ध तरतूद आणि डी.पी.रस्त्यांची जागा ताब्यात देण्यासाठी जागा मालकांची रोख मोबदल्याची मागणी लक्षात घेता तुलनेने प्रतिवर्षी विकास आराखडयातील रस्ते मोठया प्रमाणात विकसीत करण्यास मर्यादा आहे ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत रस्ते विकसन खाजगी सहभागातील करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावा अंतर्गत रस्त्याच्या जागा एफ.एस.आय.व टी.डी.आर. यांच्या मोबदल्यामध्ये ताब्यात येईल आणि रस्ते विकसनाचा खर्च विकसकास/ठेकेदारास क्रेडिट नोट स्वरूपात देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सदर क्रेडिट नोट

पुणे मनपाकडे देय असलेल्या बांधकाम परवानगी शुल्क अंतर्गत वापरता येईल तसेच ती हस्तांतरणीय देखील असेल. सन २०२१-२२ मध्ये एकूण ११ रस्ते व दोन पुलांची कामे पीपीपी मध्ये प्रस्तावित केलेली आहे. या सर्व कामांचा एकूण खर्च सुमारे र.रू.५८१ कोटी इतका असून हा खर्च २ ते ३ वर्षाच्या कालावधीत होणार आहे.क्रेडिट नोट स्वरूपात हा खर्च दिला जाणार असून, क्रेडिट नोट प्रति वर्षी खर्ची टाकण्याची मर्यादा प्रतिवर्षी र.रू.२०० कोटी इतकी ठेवण्यात आलेली आहे. जेणेकरून बांधकाम परवानगी शुल्क जमा बाजुस घट होणार नाही. सदर क्रेडिट नोट ही आगामी ५ आर्थिक वर्षामध्ये खर्ची पडणार असून त्या करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ ब अन्वये सदर बाब काम निहाय आर्थिक दायित्व नमुद करून अंदाजपत्रकात सादर करण्यात आलेली आहे.पीपीपी अंतर्गत क्रेडिट नोट मोबदल्यामध्ये रस्ते व पुल विकसीत करण्याची बाब यापुर्वी अंदाजपत्रक २०२०-२१ च्या तरतुदी अंतर्गत मा.मुख्य सभेकडून मान्य आहे. त्याचप्रमाणे पीपीपी मॉडेलनुसार क्रेडिट नोटच्या मोबदल्यात रस्ते व पुल विकसन करण्यास मा.स्थायी समिती ठ.क्र.९३६ दि.०५/०१/२०२१ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदर पीपीपी प्रस्तावामुळे मनपास थेट गुंतवणुक न करता क्रेडिट नोटच्या बदल्यात रस्त्यांची व पुलांची कामे विकसीत करण्यात येणार आहे.

## (८) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.(र. रू. ३७८.६७ कोटी)

### सन २०२०-२१

- सद्यस्थितीत पुणे महानगर परिवहन महामंडळाचा स्वमालकीचा बस ताफा १४७५ आहे.
- सद्यस्थितीत भाडेतत्वावर सीएनजी ८०६ बसेस व ई बसेस १५० अशा एकुण ९५६ बसेस ताफ्यात असून एकुण ताफा २४३१ राहणार आहे.
- कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लॉकडॉउन कालावधीमध्ये माहे एप्रिल २०२० ते ऑगस्ट २०२० कालावधीत अत्यावश्यक सेवेसाठी प्रतिदिनी सरासरी २०५ बसेस मार्गावर धावल्या असुन त्यापासून प्रतिदिनी सरासरी र.रू. ४ लक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. माहे एप्रिल ते ऑगस्ट पर्यत प्रतिदिनी र.रु. १.४८ कोटी प्रमाणे र.रु. २२६.४४ कोटी उत्पन्न बुडाले आहे. तसेच अनलॉक कालावधीत टप्याटप्याने शासनाने २५% व ५०% बसेस सुरू करणेस दिलेल्या अनुमतीनुसार मार्गावरील बस संख्येत वाढ करण्यात आली आहे. माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर कालावधीत प्रतिदिनी सरासरी ६८७ बसेस मार्गावर धावल्या असुन त्यापासून प्रतिदिनी सरासरी र.रु.३१ लक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर पर्यंत प्रतिदिनी र.रु. १.२१ कोटी प्रमाणे र.रु.११०.११ कोटी उत्पन्न बुडाले आहे. कोरोना कालावधीत माहे एप्रिल ते नोव्हेंबर मध्ये एकुण र.रू. ३३६.५५ कोटी उत्पन्न बुडाले आहे. मात्र अनावश्यक खर्चात बचत करून देखील सेवकांचे वेतनावर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असल्याने सन २०२०-२१ च्या संचलन तुटीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. कोरोना कालावधीत मोठ्या प्रमाणात उत्पन्न बुडाले असल्याने दोन्ही महापालिकांकडून सन २०१९-२० च्या संचलन तुटी पोटी प्राप्त होणारा निधी देखील अपुरा पडत आहे. त्यामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विशेषबाब म्हणुन दैनंदिन संचलन सुरळीत चालणेच्या दृष्टीने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील संचलन तुटीपोटी उचल स्वरूपात परिवहन महामंडळास पुणे मनपा ६०% स्वामित्वानुसार र.रु.१११.४८ कोटीची मागणी केली आहे.
- महामंडळाने कोरोना पार्श्वभूमीवर अत्यावश्यक सेवेसाठी पुणे मनपाकडे प्रतिमहा २२३१ आणि पिंपरी चिंचवड मनपाकडे प्रतिमहा ६५७ बसेस दिल्या आहेत त्याचबरोबर महामंडळाकडील २८६२ सेवक पुणे मनपास व ११६८ सेवक पिंपरी चिंचवड मनपास कोविड कामासाठी देणेत आलेले आहेत.

### सन २०२०-२१

| | | |
|---|---|---|
| सन २०२०-२१ अंदाजित खर्च र.रू. | - | ७४३.८९ कोटी |
| सन २०२०-२१ अंदाजित एकुण स्व उत्पन्न र.रू. | - | २२९.६१ कोटी |
| अंदाजित संचलन तुट र.रू. | - | ५१४.२८ कोटी |

**सन २०२१-२२ दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- सन २०२१-२२ मध्ये २४३१ बसेसचा ताफा राहणार आहे.
- सन २०२१-२२ मध्ये १२ मी. बीआरटी एसी इलेक्ट्रीक ३५० बसेस जीसीसी तत्वावर व फेमच्या १५० बसेस घेण्याचे नियोजन आहे.

पुणे महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात पुणे महानगर परिवहन महामंडळाकरीता करावयाच्या तरतूद रकमांचा तपशिल पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | सन २०२१-२२ साठी करावयाची तरतूद र.रू. कोटीमध्ये |
|---|---|---|
| १ | संचलन तुट (शा.नि.क्र.एनयुआर-२०१३/प्र.क्र.३३८ नवि-३३ मंत्रालय मुंबई ४०००३२ दि. १८/०२/२०१४) | ३०८.५७ |
| २ | • इ. ५ वी ते १० वी विद्यार्थ्यांना मोफत पासेस/बससेवा | ७.१० |
| | • नागरवस्ती विकास योजना अंध/अपंग पासेस | ९.५० |
| | • विविध सवलतीचे पासेस | ३.५० |
| ३ | जीसीसी तत्वावर १२ मीटर बीआरटी एसी ३५० इलेक्ट्रीक बससाठी प्रतिबस रू. ५० लाख प्रमाणे सबसिडीची रक्कम २१० बसेस (६०%) | ५०.०० |
| | **तरतूद करावयाची एकुण रक्कम रू.** | **३७८.६७** |

## (९) उद्यान (भांडवली तरतूद र. रु. ५४.२० कोटी + महसूली तरतूद र.रु. ५०.४५ कोटी = र.रु.१०४.६५ कोटी)

**सन २०२०-२१**

- **स्व.राजीव गांधी प्राणी संग्रहालय -**
- स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय कात्रज येथे हत्तीसाठी पोहण्याच्या तलावाचे काम १००% पुर्ण झालेले आहे. तसेच विविध प्राण्यांसाठीचे खंदक सिंह खंदक रस्टी स्पॉटेड कॅट लेसर कॅट शेकरु तसेच रेप्टाइल पार्कची कामे प्रगतीपथावर असुन या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.
- स. नं. ५५, वडगाव शेरी येथे "Barrier Free Access" या संकल्पनेवर आधारित दिव्यांगांकरिता अडथळा विरहीत उद्यान विकसीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- स. नं. २२७ लोहगाव, विमाननगर येथे बालकांकरीता (Toddlers) वैशिष्ठ्यपुर्ण उद्यान विकसित करण्याचे काम सुरु आहे.
- स. नं. ५२, ५३ बावधन येथील उद्यानाचे काम प्रगतीपथावर आहे.
- कै.बाळासाहेब ठाकरे उद्यान डहाणुकर कॉलनी, कोथरुड येथे सुशोभिकरण करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

**सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- **पु.ल. देशपांडे उद्यान, पुणे पेठ पार्वती स.नं.१२१,१२२ येथे फेज ३ मध्ये कलाग्राम विकसित करणे.**

विविध राज्यामधील कलाकारांना त्यांची कला सादर करणे, माहिती देणे, पाहण्यासाठी उपलब्ध ठेवणे या संकल्पनेवर आधारित प्रकल्पाची निर्मिती करण्यात येत आहे. सदरच्या कलाग्राम मध्ये स्थानिक तसेच राज्यातील कलाकारांनी तयार केलेल्या साहित्य व कलाकुसरीची माहिती कांऊटर्स, माहिती केंद्र, Display Area, तसेच २०० नागरिक बसू शकतील असे अँफिथिएटर तसेच फुड एरिया तयार करण्याचे नियोजन आहे.

- **स्व. राजीव गांधी प्राणिसंग्रहालय, कात्रज अद्ययावत मत्स्यालय  विकसित करणे**

  याप्रकल्पासाठी इंटरप्रीटेशन सेंटरच्या तळमजल्यात नव्याने मत्स्यालय करण्यासाठी अंदाजे २५० चौ. मी. एवढी जागा उपलब्ध आहे. तसेच स्व. राजीव गांधी प्राणीसंग्रहालयात मोठयाप्रमाणावर नागरिक, पर्यटक तसेच शाळेच्या सहली भेट देत असतात. येथे वर्षाला अंदाजे १६ लाख नागरिक भेट देतात. त्यामुळे सदर मत्स्यालयामुळे नागरीकांसाठी अजून एक आकर्षण निर्माण होणार आहे.

- **सारसबाग आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ विकसित करणे**

  सारसबाग व पेशवे उद्यानाचा एकात्मिक विकास आराखडा व मास्टरप्लॅन तयार करून ३२ एकर जागेवर आंतराष्ट्रीय दर्जाचे बॉटनिकल गार्डन निर्माण करण्यात येणार आहे. त्यामध्ये जैव विविधतेला धक्का न लावता बागेच्या परिसराचा पुनर्विकास करण्यात येणार आहे.

- **संवेदना पार्क**

  सामान्य नागरिकांमध्ये दिव्यांगाविषयी जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने पुणे शहरात संवेदना पार्क उभारण्यात येणार आहे. स्पर्श, वास आणि श्रवण यांच्या माध्यमातून वनस्पतीचे ज्ञान याठिकाणी होणार आहे. उद्यानामध्ये ४२ प्रकारची झाडे लावण्यात येतील, त्या झाडांविषयी ब्रेल लिपी, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषामध्ये त्या झाडाविषयी विस्तृत माहिती असेल.

- **URBAN–९५ या संकल्पनेवर आधारीत खराडी येथे उद्यान**

  लहान मुलांच्या संगोपनासाठी जन्मापासूनचे पहिले १००० दिवस (३ वर्ष) अत्यंत महत्वाचे असतात. लहान मुलांच्या मेंदूचा ९०%  विकास या दिवसात होतो, असे संशोधनातून सिद्ध झाले आहे. तसेच मुलांचा मानसिक व शारीरिक  सर्वागीण विकास चांगल्या पद्धतीने होण्याकरीता त्यांना सुरक्षित आणी सुविधा असलेले वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून उद्यानांची निर्मिती करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे.

## (१०) विद्युत (भांडवली तरतूद र. रु.२८.५६ कोटी + महसूली तरतूद र.रु. १०५.५० कोटी = र.रु. १३४.०६ कोटी)

**सन २०२०–२१**

- पुणे शहरातील नदीवरील पुलांवर आर्किटेक्चरल प्रकाश व्यवस्था करणे व सुशोभिकरण करणे या कामासाठी र.रू १७३.६० लक्ष तरतुद उपलब्ध करण्यात आली आहे. त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज पुल (नवा पुल) व डेंगळे पुल येथील आर्किटेक्चरल लाईटिंगची कामे केले असुन याचप्रमाणे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत नाविन्य पुर्ण योजनेतून र.रू. ३०० लक्ष तरतूद उपलब्ध झाली असून छत्रपती संभाजी पुल, महादजी शिंदे पुल, (बालगधंर्व पुल), यशवंतराव चव्हाण पुल, या तीनही नदीवरील पुलांवर विशिष्ट प्रकारचे आर्किटेक्चरल पद्ध्तीने प्रकाश व्यवस्थेचे काम पुर्ण झाले असून या कामांमुळे पुलांचे सुशोभिकरण झाले असून शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे.
- पुणे महानगरपालिका व क्षेत्रिय कार्यालय या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर ई–चार्जिग स्टेशनची उभारणी करणे यासाठी EESL च्या बरोबर करारनामा करण्यात आला असुन लवकरच सदर कामाची सुरूवात करण्यात येणार आहे. मिनिस्ट्री ऑफ पॉवर यांचे PSU एनर्जी एफिशियंसी सर्व्हीसेस लि. (EESL) मार्फत चार्जिंग स्टेशनची उभारणी करणेत येणार असुन इलेक्ट्रीक व्हेईकलचे वापरामुळे इंधन बचत होणार असुन प्रदुषण मुक्त पर्यावरण ठेवता येणार आहे.
- तुपे नाटयगृह हडपसर या ठिकाणी उर्वरित प्रकल्पीय कामे (एसी, स्टेज लाईटिंग,वायरिंग) साठी र.रू. ६५० लक्ष तरतुद अन्वये ही कामे पूर्णत्वास आली आहेत. तसेच बाणेर रस्ता याठिकाणी आर.के.लक्ष्मण प्रायोगिक रंगभुमी येथे विद्युत विषयक कामे करणेसाठी र.रू. ५० लक्ष तरतुदी अन्वये कामे पुर्णत्वास आली आहेत. याचप्रमाणे बाळासाहेब ठाकरे कला मंदिर कोथरूड येथे स्टेज लाईट, वातानुकुलीत यंत्रणा, ध्वनीक्षेपण यंत्रणा व वायरिंगची कामे करणेसाठी र.रू. २०० लक्ष तरतुदी अन्वये पूर्ण झालेले असुन नाटयगृहाचा वापर पुणे शहरातील नागरिकासाठी लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

- छत्रपती शिवाजी उद्यान वडगावशेरी, ज्ञानेश्वरी उद्यान वारजे माळवाडी, चिमा उद्यान बंडगार्डन या तिन्ही ठिकाणी र.रू. २४० लक्ष खर्च करून ४५ मीटर उंचीचा ध्वजस्तंभ उभारून त्यावर राष्ट्रीय ध्वज उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे.
- कैलास स्मशानभूमी येथे पर्यावरण पुरक दोन विद्युत दाहिनी उभारणेचे काम पूर्ण करण्यात आले असून त्या वापरासाठी खुल्या करण्यात आल्या आहेत.

  नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम अंतर्गत र.रू. २०० लक्ष तरतुद उपलब्ध झाल्याने हडपसर, बावधन व वैकुंठ या तीन ठिकाणी विद्युत दाहिनी उभारणीचे कार्यादेश देण्यात आले असून उभारणीचे काम प्रगती पथावर आहे.

**सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- शहरातील प्रकाश व्यवस्थेमध्ये केंद्र शासनाच्या धोरणानुसार एल.ई.डी दिवे बसविणे (EESL) अंतर्गत यापूर्वी सन २०१९ -२० व २०२०-२१ या कालावधी मध्ये शहरातील जुने नादुरूस्त एल.ई.डी दिवे बदलने व नवीन पोलसाठी एल.ई.डी दिवे बसविणे कामा अतंर्गत एकुण ४२ हजार एल.ई.डी दिवे EESL चे माध्यमातून बसविले असून सन २०२१-२२ मध्ये अंदाजे ३० हजार नग एल.ई.डी दिवे बसविणेत येणार आहेत.
- पुणे शहरातील पथ दिवे सक्षम व अद्यावत करणेसाठी र.रू. १० कोटी तरतूद करणेत आली आहे.
- समाविष्ट गावांतील प्रकाश व्यवस्था सक्षम करणेसाठी एकुण ११ गावांमध्ये पोल व एल.ई.डी दिवे बसविणेची आवश्यकता असून त्यासाठी तरतूद करणेत आली आहे.
- शहरातील महत्वाच्या रस्त्यांवरील प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करणे कामी तरतूद करणेत आली आहे.
- पुणे शहरातील विविध स्मशानभूमी, मनपा शाळा, दवाखाने, इत्यादी ठिकाणी विद्युत विषयक कामे पुर्ण करणेसाठी (प्रकाश व्यवस्था, जनरेटर व्यवस्था, वायरिंग, सोलर हॉट वॉटर यंत्रणा) तरतूद करणेत आली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी होणाऱ्या वीज वापरापोटी येणाऱ्या वीज बिलामध्ये बचत करणेच्या दुष्टीने एक्सप्रेशन ऑफ इन्ट्रेस्टच्या माध्यमातुन वीज खरेदीचे प्रस्ताव मागविण्यात येत असुन पुणे मनपा आता ओपन ॲक्सेसमधुन वीज खरेदी करून वीज बिलात बचत करणार आहे

## (११) अमृत अभियान व स्मार्ट सिटी, जनेराशपुअ वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्प

**सन २०२०-२१**

- अमृत अभियान व स्मार्ट सिटी, ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्प, बीएसयूपी या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०२०-२१ साठी आवश्यक तरतुद र.रु.९८.१६ कोटी मंजूर आहे.
- ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधीमध्ये मंजूर झालेले तसेच अमृत अभियानांमध्ये समावेश झालेल्या भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेसाठीची तरतुद र.रु.४८ कोटी व वडगाव बुद्रुक प्रकल्पासाठी र.रु.१.६० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त बीएसयुपी योजनेअंतर्गत र.रु ५.६० कोटी तरतूद केली आहे.
- अमृत अभियान अंतर्गत सुरु असलेल्या हरित क्षेत्र विकास प्रक्ल्पांसाठी र.रु.१.२० कोटी तरतूद करण्यात आली आहे व पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४ X ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे पाणी पुरवठा विभागाच्या अंदाजपत्रक 'क' मध्ये र.रु. ६० कोटी तरतुद करण्यात आली आहे.
- स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांसाठी र.रु.४० कोटी मनपा समहिश्याची तरतुद अनुदान म्हणून करण्यात आली आहे.

**सन २०२०-२१ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्प**

- ज.ने.रा.श.पु.अ.अंतर्गत वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्पातील भामा आसखेड या प्रकल्पाचे चारही हप्ते प्राप्त झालेले आहेत. सदर महत्वकांक्षी प्रकल्प डिसेंबर २०२० मध्ये पूर्ण झालेला आहे.
- अमृत अभियानांतर्गत हरित क्षेत्र विकास यासाठी आत्तापर्यंत र.रु. २.०३ कोटी इतका खर्च झाला असून, प्रकल्प दिनांक ३१/१२/२०२० अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे पुनर्नियोजन आहे.

### सन २०२१–२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- अमृत अभियान व स्मार्ट सिटी, ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधीमधील प्रकल्प, बीएसयुपी या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०२१–२२ साठी एकूण आवश्यक तरतूद – र.रु.११०.५६ कोटी प्रस्तावित आहे. या व्यतिरिक्त पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४X७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणेसाठी पाणीपुरवठा विभागाच्या अंदाजपत्रक 'क' अंतर्गत र.रु. १०० कोटी इतकी तरतुद विभागाद्वारे सूचविण्यात आली आहे.
- उपरोक्तनमूद मुद्यामध्ये स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा र.रु. ५० कोटी इतकी तरतूद अनुदान म्हणून प्रस्तावित आहे.
- अमृत अभियान अंतर्गत प्रकल्पासाठी केंद्र शासन व राज्य शासनाचा अपेक्षित प्राप्त होणारा निधी र.रु. २४.९६ कोटी इतका आहे.

### सन २०२१–२२ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना–

- पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४X७)अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे (प्रकल्पीय सुधारित र.रु.२३५.९४ कोटी) प्रकल्पा अंतर्गत खात्याने माहिती दिलेनुसार या प्रकल्पाची भौतीक प्रगती ५४% व वित्तीय प्रगती ५३% आहे.
- सदर प्रकल्पामध्ये ८२ टाक्यांचे बांधकाम नियोजित होते. तथापि, जागेच्या अडचणीमुळे व हायड्रोलिक डिझाईनमध्ये काही फेरबदल झाल्याने काही ठिकाणी एक टाकी दोन ते तीन विभागामध्ये बांधण्यात येणार आहे. त्यामुळे टाक्यांची एकुण संख्या ८२ वरुन ८६ झालेली असून प्रकल्पीय खर्चात वाढ होणार नसून एकूण ८६ पाण्याच्या टाक्या बांधण्याचे नियोजन आहे. त्यातील ७३ पाण्याच्या टाक्यासाठी जागा उपलब्ध झालेली असून, त्यातील ३० टाक्यांची कामे पूर्ण झालेले आहेत.
- उर्वरित टाक्या पूर्णत्वाच्या विविध टप्प्यावर आहेत आणि उरलेले टाक्यांचे काम दिनांक ३१/०७/२०२१ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे पुनर्नियोजन आहे.

## (१२) <u>भवन रचना (भांडवली तरतूद र. रु. ३४१.८१ कोटी + महसूली तरतूद र.रु. ३५.४४ कोटी = र.रु. ३७७.२५ कोटी)</u>

### सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

**सन २०२०–२१ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/ सुरु असलेले प्रकल्प –**

- बावधन येथे नवीन फायर स्टेशन व ट्रेनिंग सेंटर उभारणेचे ५०% कामे पूर्ण करणेत आलेली असुन सन २०२१–२२ मध्ये उर्वरित कामे करणेत येत आहेत.
- हडपसर येथील फायर स्टेशनचे काम पूर्ण करणेत आले आहे.
- सिंहगड किल्ल्यावरील स्वराज्य निष्ठ शिल्प व नरवीर तानाजी मालुसरे समाधी स्थळ सुशोभिकरणाचे कामे पूर्ण करणेत आलेली असुन सन २०२०–२१ मध्ये बाहेरील परिसरामध्ये पर्यटकांसाठी मुलभुत सोयी व सुविधांची कामे करणेत येत आहेत.
- बाणेर येथे आर.के.लक्ष्मण यांच्या नावाने कलादालन उभारणेचे काम पूर्ण झालेले असुन अंतर्गत सजावटी व कलात्मक बाबींचे कामे पूर्ण करणेत येत आहेत.
- नानावाडा येथील फ्रिडम फायटर म्युझियमसाठी विविध क्रांतिकारकांची दालने उभारणेची कामे पूर्ण करणेत आलेली आहेत.
- शिवाजीनगर येथे डॉ.होमी भाभा हॉस्पिटल पाडुन नव्याने विकसित करणेचे काम सुरू आहे.

- वैकुंठ स्मशानभुमी येथे नवीन दशक्रिया विधी घाट परिसर विकसित करणेत येत आहे.
- कोथरुड येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कलामंदिराचे फेज -१ चे काम पूर्णत्वास असुन सन २०-२१ मध्ये फेज - २ चे काम सुरू करणेत येणार आहे.
- हडपसर येथे राजर्षी शाहु संकुलामधील कै.विठ्ठलराव तुपे नाटयगृहाचे काम अंतिम टप्प्यात आहे.
- नगररोड येथील क्षेत्रिय कार्यालयाची इमारतीचे मार्च-२०२१ अखेर ८०% काम पूर्ण करणेत येत आहे.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय लक्ष्मीनगर येथील नवीन इमारतीचे काम पूर्णत्वास आलेले आहे.
- बाणेर स.नं. ११४+११५ येथे नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हॉस्टेल बांधुन पूर्ण होणार आहे.
- वडगांव बुद्रूक. स.नं. ५५/१ पार्ट येथे शाळेची इमारत बांधणेत येत आहे.
- प्रभाग क्र. १ क, (कळस धानोरी) मधील स.नं. १९/४ येथील ॲमिनिटी स्पेसवर राजयोग मेडिटेशन ध्यान योग केंद्र विकसित करणेचे उर्वरीत काम पूर्ण करण्यात येणार आहे . प्रभाग क्र.१क,(कळस धानोरी) मधील स.नं.१९/४ येथील ॲमिनिटी स्पेसवर अग्निशामक केंद्र उभारण्याचे उर्वरीत काम करणे. प्रभाग क्र.१ ड, (कळस धानोरी) मधील मुंजाबावस्ती येथील सुरू असलेल्या ई-लर्निंग स्कुलचे उर्वरीत कामे करण्यात येत आहे.
- प्रभाग क्र. २९ मनपा शाळा क्र. ८० जी, कै. बा.ग. जगताप शाळेचे नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीचे उर्वरीत बांधकाम पूर्ण करण्यात येत आहे.
- प्रभाग क्र. २ कळस धानोरी मधील स.नं. ३६ ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर लाईट हाऊस व स्पर्धा परीक्षा केंद्राचे पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करण्यात येत आहे.

**सन २०२१-२२चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- कोथरुड येथे नवीन बालनाट्यगृह उभारणे/यशवंतराव चव्हाण नाट नाट्यगृहाचे विस्तारीकरण करणेचे कामे पूर्ण करणेत येणार आहे. (पोडीयम पार्किंग)
- भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय वारजे येथे मॅटर्निटी होम हॉस्पिटल बांधणेत येणार आहे.
- बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयासाठी नवीन इमारत बांधुन पूर्ण करणेत येणार आहे.
- हडपसर येथे सांस्कृतिक (मल्टीपरपज) हॉल बांधणेत येणार आहे. हडपसर येथील राजर्षी शाहु संकुलाचे काम पूर्णत्वास येणार आहे तसेच ससाणेनगर काळेबोराटे रोड वरील शाळेसाठी आरक्षित जागेवर सेमी इंग्लिश शाळेचे बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे.

**सन २०२१-२२ मधील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- कोथरूड येथे शिवसृष्टी उभारणेत येणार आहे.
- घोले रोड येथे नगर वाचनालय (सिटी लायब्ररी) बांधण्याचे नियोजन आहे.
- कोथरूड येथे एक्झिबिशन सेंटरची उभारणी करणे व त्या अंतर्गत ग.दि.माडगुळकर यांचे स्मारकाचे समावेश करणेत आला आहे.
- बालगंधर्व रंगमंदिर पुनर्निर्माण करणेत येणार आहे.
- पुणे मनपाच्या कर्मचाऱ्यांचे राहणीमान सुधारणेचे अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या वसाहतींचे पुनर्निर्माण करणेचे अभियान हाती घेणेत येणार आहे.
- अण्णासाहेब मगर दवाखान्याची जुनी इमारत पाडुन नवीन अद्यावत हॉस्पीटल इमारत बांधणेचे काम करणेत येणार आहे.
- बाणेर स.नं.८८ येथे आदिवासी / मागासवर्गीय विद्यार्थीनी, महिलांकरीता निवासी प्रशिक्षण केंद्र बांधणे.
- नगररोड क्षेत्रिय कार्यालयाची इमारत बांधुन पूर्ण होणार आहे.

- प्रभाग क्र. ६१ वानवडी स.नं. ७७ येथील जुनी अस्तित्वातील महादजी शिंदे शाळा पाडुन नवीन ई-लर्निंग शाळा इमारत मार्च २०२२ अखेर बांधुन पूर्ण होणार आहे.
- पुणे मनपाच्या कमला नेहरू या दवाखान्यामध्ये नवीन ब्लड बँक विकसित करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करण्यात येणार आहे.
- प्रभाग क्र.१ कळस धानोरी स.नं. ३८/१ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर आदिवासी समाजातील विदयार्थ्यांसाठी नवीन निवासी शिक्षण केंद्र बांधणे.
- प्रभाग क्र. ३९ क मधील दुर्वांकुर गार्डन परिसरात स्पोर्टस् कॉम्पलेक्स विकसित करणे.

## (१३) माहिती व तंत्रज्ञान (भांडवली ५० कोटी + महसुली र. रू. ४५.९६ कोटी)

**सन २०२०-२१**

**पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सन २०२०-२१ या वर्षातील कामांची फलनिष्पत्ती -**

- **कोविड-१९ -**
- माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत कोविड-१९ बाबत प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या. जी.आय.एस.प्रणालीचा वापर करून सुक्ष्म प्रतिबंधक क्षेत्र तयार करणे, विमानतळावर आगमन होणाऱ्या गृह विलगीकरण करण्यात आलेल्या प्रवाशांवर देखरेख व नियंत्रण करण्यासाठी 'सैय्यम' व नागरिकांचा सर्व्हे करण्यासाठी 'वयश्री' मोबाईल ॲप व ''माझे कुटुंब, माझी जबाबदारी'' मोबाईल ॲपचा वापर करण्यात आला. शहरातील नागरिकांना कोरोनाबाबत जन-जागृती करण्यासाठी व आवश्यक त्या सूचना देण्यासाठी सोशल मिडीया माध्यमाचा वापर करण्यात आला. कोरोनाबाबतची सर्व माहिती मनपाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र वेबपेज तयार करून नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली. कोरोनाबाबतचे कामकाजाकरीता सर्व क्षेत्रिय कार्यालये, मनपा मुख्य भवन, आपत्ती व्यवस्थापन विभागांमध्ये वॉर रूम तयार करून त्याद्वारे **Contact Tracing** रूग्णांचे समन्वय, रूग्णांबाबत माहिती, बेड मॅनेजमेंटबाबत विविध कॉल सेंटर्स कार्यान्वीत करण्यात आले. तसेच 'आरोग्यधीर' मोबाईल ॲपद्वारे टेलिमेडिसीन यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली. तसेच कोरोना बाधीत रूग्णांचा फॉलोअप घेण्यासाठी दूरध्वनी नेटवर्कची व्यवस्था करण्यात आली. सर्व रूग्णालयातील **Critical Patient** ची माहिती, उपचार व मेडिकल इन्फॉरमेशन प्राप्त होणेकरीता **Critical Patient Management System** ची अंमलबजावणी करण्यात आली. विविध कोविड केअर सेंटर, स्वॅब सेंटर्स, रूग्णालये या ठिकाणी संगणक संच, प्रिंटर व इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.
- **पी.एम.सी.केअर २.० -**
- पुणे महानगरपालिकेमार्फत नागरिकांच्या सुविधेसाठी **PMC CARE** हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. यामध्ये नागरिकांशी व मनपा सेवकांशी संबंधित सर्व विभागांसाठी तक्रार व्यवस्थापन प्रणाली अद्ययावत करण्यात आली. सध्या नागरिकांमध्ये सोशल मिडीयाचा वापर मोठया प्रमाणात होत असल्याने नागरिकांना पुणे मनपाकडे तक्रार सुलभपणे करण्यासाठी फेसबुक, ट्विटर, व्हॉट्स-ॲप, ई-मेल, एस.एम.एस.कॉल सेंटर क्रमांक इत्यादी माध्यमे उपलब्ध करून देण्यात आली. तक्रार व्यवस्थापन प्रणालीमध्ये विविध माध्यमांमधून आतापर्यंत २७१३२० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत व २६०७८० (९६.१२ %) इतक्या तक्रारी निरस्त झालेल्या आहेत.
- **सोशल मिडीया -**
- मनपाच्या सर्व विभागांची नागरिकाभिमुख माहिती मनपाचे विविध सोशल मिडीया हॅन्डल्सद्वारे वेळोवेळी प्रसिध्द केली जाते. यावर्षी नागरिकांमध्ये कोरोनाबाबत जनजागृती करण्यासाठी व कोरोनाबाबत काळजी घेण्यासाठी विविध उपाययोजना व आवश्यक त्या सूचना देण्यासाठी सोशल मिडीयाचा वापर मोठ्याप्रमाणात झाला आहे. कोरोना काळामध्ये कोरोनाबाबत केलेल्या उपाययोजना, जन-जागृतीमुळे नागरिक मोठ्या प्रमाणामध्ये पुणे मनपासोबत सोशल मिडीयामार्फत संपर्क साधत असून कोरोना काळामध्ये सोशल मिडीयाच्या फॉलोव्हर्सची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे.

- तसेच नागरिकांच्या तक्रारी प्राप्त करून घेण्यासाठी देखील सोशल मिडीयाचा वापर करण्यात येत आहे. आत्तापर्यंत सोशल मिडीयाच्या माध्यमातून एकुण ५९६६२ तक्रारी प्राप्त झाल्या व ५७४४९ तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे. पुणे मनपाच्या फेसबुक पेजवर आत्तापर्यंत ६७९१६ लाईक्स व ७१९९१ फॉलोव्हर्स आहेत व ट्विटर हँडलवर ९०६०० फॉलव्हर्स आहेत.
- **WebSite:-**
- माहिती व तंत्रज्ञान विभागाने सर्व विभागांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी **Content Management System (CMS)** तंत्रज्ञानावर आधारित संकेतस्थळ विकसीत करण्यात आले आहे. यामध्ये सर्व विभाग व क्षेत्रिय कार्यालये यांच्यासाठी स्वतंत्र **Micro Site** विकसीत करण्यात आले आहे व संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत करण्यासाठी सर्व विभागांना स्वतंत्र युजर आय.डी. व पासवर्ड देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने सर्व माहिती अद्ययावत करण्यात येत आहे. पुणे मनपा संकेतस्थळ जगातील बहुसंख्य देशांमध्ये पाहिले जाते. आतापर्यंत संकेतस्थळाला ९,६७,७७,७२२ व्हिजीटर्स असून २०,३८,०३७ युनिक व्हिजीटर्स आहेत.
- **ऑनलाईन संगणक प्रणाली अंमलबजावणी –**
- पुणे मनपामार्फत ई–गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत पुणे शहरातील नागरिकांना ऑनलाईन स्वरूपात सेवा सुविधा उपलब्ध करून देणेकरीता विविध संगणक प्रणाली विकसीत करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये ऑनलाईन मिळकत कर भरणा, मिळकत कर ना–हरकत पत्र, पाणीपट्टी भरणा, विवाह प्रमाणपत्र, तक्रार संगणक प्रणाली, बांधकाम परवाना, मनपा टीडीआर ऑनलाईन, विविध प्रकारचे परवाने, वृक्ष कापणी परवानगी व ई–टिकिटींग संगणक प्रणाली इत्यादी सेवा ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. एस.एम.एस.गेट–वे चा प्रभावीपणे वापर करून मिळकत कर महसूलामध्ये वाढ झाली आहे. **Document Management System (DMS)** या ऑनलाईन संगणक प्रणालीमधून पुणे मनपातील सर्व विभागातील दस्तऐवज संकलीत करून त्याचे व्यवस्थापन करणे सहज शक्य होणार आहे.
- **महाटेंडर संगणक प्रणाली अंमलबजावणी –**
- सर्व शासकीय संस्थांमार्फत राबविल्या जाणाऱ्या ऑनलाईन निविदेचे व्यवस्थापन पारदर्शक, प्रभावीपणे व **Centralized** पध्दतीने होणेकरीता मे.महाराष्ट्र शासनाने महाटेंडर ऑनलाईन ई–निविदा संगणक प्रणाली विकसीत केली आहे. मनपातील सर्व विभागांमध्ये विविध प्रक्रिया अंमलबजावणी ही महाटेंडरच्या संगणक प्रणालीद्वारे यशस्वीरित्या करण्यात येत आहे.
- **Direct Benefit Transfer (DBT):-**
- थेट लाभ हस्तांतरण (**DBT**) या योजने अंतर्गत विविध कल्याणकारी योजनांमध्ये मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतर लाभार्थ्यांच्या बँक जमा खात्यात करण्यात येते. याकरीता पुणे मनपामार्फत ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीद्वारे दहावी व बारावीची स्कॉलरशिप, समाज विकास विभागाकडील सर्व योजना ऑनलाईन सुविधा देऊन अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## <u>सन २०२१–२२</u>

पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सन २०२०–२१ या वर्षातील प्रस्तावित कामे खालीलप्रमाणेः–

- **Integrated Command & Control Center(ICCC)** -
- सद्यस्थितीमध्ये कार्यान्वित असलेल्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील **War Room** चे अद्ययावतीकरण मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये करणे प्रस्तावित आहे. सदरच्या **Command & Control Center** मध्ये स्मार्ट सिटी, पोलीस, अग्निशमन विभाग, पी.एम.पी.एम.एल. व पुणे मनपामधील कार्यान्वित सर्व संगणक प्रणालींचे **Integration** हे **Centralised** पध्दतीने करण्यात येणार आहे. **Command & Control Center (CCC)** द्वारे तक्रार निवारण, आपत्ती व्यवस्थापन, सी.सी.टि.व्ही., वाहतूक नियोजन, व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टीम इत्यादी

बाबींचे नियोजन व व्यवस्थापन करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रशासकीय निर्णय घेणे सहज शक्य होणार आहे. सदर प्रकल्प अंमलबजावणी आपत्ती व व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात येणार आहे.

- **Dashboard & Data Analytics -**
- पुणे मनपामधील विविध विभागांकडे विविध प्रकारची व उपयुक्त माहिती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. उपलब्ध माहिती वरून मनपाकरीता उपयुक्त असलेला डेटाचे परिक्षण व वर्गीकरण **Data Analytics** चा वापर करून केला जातो. **Data Analytics** चा वापर करून मिळालेल्या माहिती वरून महत्वाचे व हितकारक निर्णय घेणे, उत्पादन क्षमता वाढविणे, अनावश्यक माहिती शोधून काढणे, सुरक्षा निकष ठरविणे इत्यादी बाबी अंमलात आणणे शक्य आहे. **Data Analytics** या माध्यमाद्वारे पुणे मनपातील विविध विभागातील माहिती संकलन, विश्लेषण व परिक्षण करणे शक्य होणार आहे. सदरच्या सर्व माहितीचा अहवाल ग्राफ, चार्ट, ट्रेंड लाईन्स इत्यादीच्या स्वरूपात डॅशबोर्डवर दाखविणे शक्य आहे. **Data Analytics** चा वापर करून मनपातील विभागांचे कामकाज गतीमान होणार आहे.
- पुणे मनपाच्या कर आकारणी व कर संकलन विभागामध्ये अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा **Artificial Intelligence** व **Data Analytics** चा प्रभावी वापर करून कर महसूलामध्ये वाढ होणेकरीता सदर प्रकल्प प्रस्तावित आहे.
- **Property Tax Software अद्ययावतीकरण** :-
- पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत पुणे शहरातील मालमत्ता व मिळकती विषयक कामकाज करण्यात येत असून पुणे महानगरपालिकेचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे सद्यस्थितीतील संगणक प्रणाली नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अद्यावतीकरण करणे अत्यंत महत्वाचे असल्याने सदर कामकाज करणे प्रस्तावित आहे.
- **नगरसचिव विभाग दस्तऐवज स्कॅनिंग –**
- पुणे महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडील सन १९५० पासूनचे सर्व जुने व महत्वाचे दस्त, नस्ती, नोंदी, अभिलेख, विविध समिती निर्णय इत्यादी महत्वाचे रेकॉर्ड स्कॅनिंग करून डिजीटल स्वरूपात जतन करणे व भविष्यातील गरजेप्रमाणे त्याचा वापर करणे प्रस्तावित आहे. याबाबतच्या निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.
- **Backup Solution**:-
- पुणे महानगरपालिकेतील विविध विभागांमार्फत नागरिकाभिमुख सेवासुविधा उपलब्ध करून देणेकरीता विविध ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत करणेत आलेल्या आहेत. सदर संगणक प्रणालींची संगणकीय माहिती सुरक्षेच्या दृष्टीकोनातून जतन करणे गरजेचे व अत्यावश्यक असल्याने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला सर्व संगणक प्रणालींच्या डाटाचा बॅकअप घेण्याचे कामकाज सुरू असून **Backup Solution** कार्यरत ठेवणे प्रस्तावित आहे.

## (१४) <u>हेरिटेज सेल</u>

### सन २०२०–२१

**सन २०२०–२१ च्या दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती.**

- पर्वतीपायथा येथे आर्टिस्ट यांना चित्रकला व शिल्पकला सराव यासाठी व्यवस्था करणे तसेच पेशवे शिल्पसृष्टी उभारणेचे काम सुरु आहे.
- मास्टर प्लॅनिंग नुसार लालमहाल येथे विकासाची कामे करणेत येत आहे.
- पुणे शहराच्या ऐतिहासिक महत्व असलेल्या शनिवारवाडा, नानावाडा, विश्रामबागवाडा, महात्मा फुले मंडई इ. वास्तुंच्या जतन संवर्धनाची कामे करण्यात येत आहेत.
- पुणे शहराचे महत्व व माहिती पर्यटकांसाठी मिळणेसाठी हेरिटेज वॉक प्रकल्प राबविणेत येत आहे.

### सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती

- सिंहगडावरील छत्रपती राजाराम महाराजांची समाधी स्थळाचे सुशोभीकरण करणे.
- सिंहगड किल्ल्यावर पर्यटक व खगोल शास्त्रज्ञ यांच्यासाठी दुर्बिण बसविणे.
- आद्य क्रांतीकारक उमाजी नाईक स्मारक येथे विविध विकास कामे करणे.
- नानावाडा येथे आद्य सशस्त्र क्रांतीकारक यांचे जीवन चरित्रावर आधारित म्युझियमचे दुसऱ्या फेजमधील काम करणे.

### सन २०२१-२२ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना

- लालमहाल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा शाहिस्तेखानावर हल्ला या प्रसंगावर आधारित फिल्म तयार करणे.
- पुणे शहरातील कोंढवा येथे विविध हेरिटेज व्हिलेज/पार्क यांची उभारणी करणे.
- भिडेवाडा दुरुस्ती करणे व स्मारक उभारणे.
- टुरिझमसाठी विविध ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविणे.
- कोरेगाव पार्क, हेरिटेज पार्क, बंडगार्डन आर्ट प्लाझा, घोलेरोड आर्ट गॅलरी कार्यान्वित करणे.
- बंडगार्डन आर्ट प्लाझा येथे स्वच्छता गृह, वेटिंग शेडचे काम करणे.
- पुणे पर्यटन वाढीसाठी ब्रोशर्स/पुस्तिका तयार करणे.

## (१५) <u>शिक्षणासाठी आधुनिक सुविधा</u> <u>(प्राथमिक र. रू.३८४.३७ कोटी, माध्यमिक शिक्षण र. रू. ७१.७२ कोटी)</u>

### सन २०२०-२१

- **डीबीटी** - प्राथमिक शिक्षण विभागाकडील सुमारे ९३,७८७ विदयार्थी /पालकांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजने अंतर्गत गणवेश, स्वेटर, दप्तरे, बुटमोजे, वहया, पाटया, चित्रकला साहित्य क्रिडानिकेतन व विद्यानिकेतन शाळांमधील साहित्य इत्यादीसाठी तरतूद करण्यात आली होती. तथापि, सन २०२० या वर्षात शाळा बंद असल्याने सदर तरतूद खर्ची पडलेली नाही.
- **ई-लर्निंग** - बी.एस.एन.एल. व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व २६५ शाळांमध्ये ई- लर्निंग सुविधा पुरविण्यात आली आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षण विभागाच्या मध्यवर्ती कार्यालयात १ व्हर्च्युअल स्टुडिओ, ९१ व्हर्च्युअल क्लासरुम, ४९५ डिजिटल क्लासरुम सध्या सुरू आहेत. उपरोक्त स्टुडिओमधून आदर्श पाठ तसेच adaptive (ॲडॅप्टीव्ह) लर्निंग, मॅनेजमेंट सिस्टीम इत्यादी संगणकीय प्रणालीचा पर्याप्त वापर करण्यात आला. कोविड १९ महामारीच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद असल्या तरी ऑनलाईन शिक्षणासाठी Edu Mitra Apps च्या माध्यमातून ई लर्निंगचा उपक्रमाचा उपयोग विद्यार्थी शिक्षकांना झाला.
- **मॉडेल ऑर्फ एक्सलन्स स्कुल** - प्राथमिक शिक्षण विभागाचे १० शाळांमध्ये मॉडेल ऑफ एक्सलन्स स्कुल हा उपक्रम पुणे महानगरपालिका व पुणे सिटी कनेक्ट या संस्थेव्दारे सुरु करण्यात आली. एकुण ५ इमारतीतील १० शाळांमध्ये जीवन शिक्षण हा मुल्यशिक्षणावर व अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर आधारीत अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. तसेच मैदाने विकसीत करुन विविध क्रीडा विषयक उपक्रम राबविणे, रोबोटिक प्रयोग शाळा, म्युझिक रुम इत्यादी बाबी तयार करणे प्रस्तावित आहे.
- **विशेष मुलांची शाळा** - पुणे महानगरपालिकेची विशेष मुलांची शाळा क्र. १४ बी शिवाजीनगर येथे कार्यरत आहे. तेथे एकुण २२ विद्यार्थी शिकत आहेत. शाळेत येणारी मुले ही सेरेब्रल, अस्थिव्यंग, स्वमग्न व बहुविकलांग असल्याने त्यांच्या गरजा विशेष असतात. त्यांना वाहतुकीची सुविधा पुरविण्यात येते.

## शैक्षणिक उपक्रम सन २०२०–२१

- **शिक्षण परिषद** – दरमहा Online शिक्षण परिषद घेण्यात आल्या. यामध्ये ताणतणाव व्यवस्थापन, सामाजिक व भावनिक शिक्षण Online अध्यापनाचे तंत्र इत्यादी बाबींचे मार्गदर्शन केले.
- **शिक्षक सहयोगी दल कामकाज** – शिक्षकांचे Online प्रशिक्षण, संपर्कात असलेल्या विद्यार्थ्यांचे Online/Offline शिक्षणासंबंधी आढावा घेणे, शिक्षकांना तंत्रज्ञान विषयक झूम, गुगल मिटिंग, गुगल क्विझ इत्यादीचे मार्गदर्शन, मोबाईल तसेच संगणक विषयक फिचर्सची माहिती देणे, विद्यार्थ्यासाठी स्वाध्याय पुस्तिकेची निर्मिती, छपाई व वितरण करणे. शिक्षण परिषदेमध्ये सुलभन व तांत्रिक सहकार्य करणे इ. कामे शिक्षक सहयोगी दलामार्फत केली जातात.
- **शिष्यवृत्ती परीक्षा** – इयत्ता ५ वी ते ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षात एकुण ५६ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये चमकले आहेत. (इ. ५ वी ४३, इ. ८ वी १३)

## सन २०२१–२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- **गुणवत्ता कक्ष** – शिक्षकांना मार्गदर्शन करणेसाठी व संशोधनात्मक कार्य करणेसाठी गुणवत्ता कक्षाची स्थापना करणे प्रस्तावित आहे. शिक्षक सहयोगी दलामधील शिक्षकांमार्फत गरजेनुसार शिक्षकांना प्रशिक्षण देणे, संशोधन करणे, विविध शैक्षणिक साहित्य तयार करणे अशा प्रकारच्या योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.
- शिक्षक सहयोगी दल याची मुदतवाढ करून पुढील पाच वर्षासाठी सदर शिक्षक सहयोगी दल कार्यान्वित ठेवणे व स्वतंत्र आर्थिक तरतूद असणे आवश्यक आहे. शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक साहित्य, स्वाध्याय पुस्तिका, मार्गदर्शक पुस्तिका यांची छपाई या बाबी प्रामुख्याने शिक्षक सहयोगी दल मार्फत केल्या जातील.
- पुणे महापालिकेकडून चालविण्यात येणाऱ्या क्रीडा निकेतन शाळेतील विद्यार्थ्यांना अध्यापनाबरोबरच क्रीडाविषयक विशेष प्रशिक्षण देण्यात येते या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडास्पर्धांमध्ये यश मिळविले आहे क्रीडानिकेतन शाळेमधून एकुण ७० विद्यार्थ्यांनी राज्यपातळी व ३ विद्यार्थ्यानी राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य मिळविलेले आहे. त्यांच्यासाठी अपघात विमा योजना सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.
- महापालिकेच्या प्राथामिक शाळांमधील विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात यासाठी स्वच्छ शाळा स्पर्धांचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे.

## माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका

## सन २०२०–२१

### पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांकडील विद्यार्थ्यांसाठी राबविलेले विशेष उपक्रम.

- **मोफत पाठ्यपुस्तके –** पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी व पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेतील शिक्षण घेणाऱ्या इ.९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके बालभारती संस्थेकडून खरेदी करून वितरीत करण्यात आली.
- **मोफत गणवेश**– पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडील इ. ५ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्यात येतात. सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात गणवेशा बाबतची कार्यवाही भांडार विभागाकडून करुन १२५०० विद्यार्थ्यांना गणवेशाची रक्कम डी.बी.टी अंतर्गत त्यांच्या बँक खात्यावर जमा करणेत येत आहे.
- **मोफत बसपास सुविधा**– मा. मुख्य सभा ठ.क्र. ४० दि. २०/०४/२०१५ ने पुणे महानगरपालिका हद्दीतील इ. ५वी ते १०वी पर्यंतच्या शहर निवासी विद्यार्थी व विद्यार्थीनीं सन २०१५–१६ या शैक्षणिक वर्षात पास देताना पुणे महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना मोफत व इतर शाळांतील विद्यार्थ्यांना पास देताना त्यांच्याकडून २५ टक्के रक्कम घेवून उरलेली ७५ टक्के रक्कम पुणे महानगरपालिकेकडून पीएमपीएमएलला २०२०–२१ अदा करण्यात येणार आहे.

- **मोफत २१ अपेक्षित प्रश्न संच** – इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना मोफत २१ अपेक्षित प्रश्न संचाची रक्कम डी.बी.टी अंतर्गत खात्यावर जमा करण्यात येणार आहे.
- **शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना** – पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील इ. १०वी व १२वी च्या अनुक्रमे ज्या विद्यार्थ्यांना ८५ टक्के व ८० टक्के पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत अशा विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु. ५१०००/– अर्थसहाय्य देण्यात येते. या वर्षी पुणे महानगरपालिका संचलित शाळांकडील इ. १० वी व १२ वी चे २३० विद्यार्थ्यांना र.रू. १,१७,३०,०००/– इतका लाभ देण्यात आला.
- **सॅनिटरी नॅपकीन –** घनकचरा विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडून सॅनिटरी नॅपकीन प्राथमिक व माध्यमिक ११ ते १९ वयोगटातील विद्यार्थिंनीना पुरविण्यात येणार आहे.
- १० वीच्या विद्यार्थ्यासाठी मार्गदर्शन व्याख्यानमाला – माध्यमिक विभागाकडील इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाचे तंत्र, परीक्षा पध्दती व करिअर निवड बाबत मार्गदर्शनपर व्याख्यानमाला आयोजित करण्यात येणार आहे.

**सन २०२१–२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- सन २०२०–२०२१ मध्ये राबविण्यात आलेल्या मोफत पाठयपुस्तके व गणवेश, मोफत बस पास सुविधा, मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंच, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना, NSQF (National Skill Qualification Framework) योजना, सॅनिटरी नॅपकिन, इ. ११ वी व १२ वी दिलक्षी अभ्यासक्रम, औदयोगिक प्रशिक्षण केंद्र, सी.एस.आर. अंतर्गत उपक्रम सन २०२१–२०२२ मध्येही प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.
- तसेच NSQF (National Skill Qualification Framework) व राज्य शासनाचे उदिष्टानुसार "Model ITI" प्रमाणे पुणे महानगरपालिका संचलित श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) चे अद्ययावतीकरण व नुतनीकरण करण्यात येणार आहे.
- याशिवाय विदयार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमासोबतच क्रीडा, सांस्कृतिक, व्यवसाय कौशल्य इत्यादी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

## (१६) <u>सामान्य प्रशासन</u>

**सन २०२०–२१**

- **सफाई कर्मचारी नेमणूकीकरिता** Online System **चा वापर सुरु करणे**

  पुणे महानगरपालिकेच्या आस्थापानेवरील घाणभत्ता अनुज्ञेय असणारे शेडयुलमान्य पदावरील सफाई सेवकांच्या विविधकारणास्तव रिक्त जागी त्यांचे एका पात्र उमेदवारास मा. लाड/पागे कमिटीच्या शिफारशी व मे. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तरतुदीनुसार नियुक्तीची कार्यवाही करण्यात येते. अशा पात्र वारसांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर वारसांकडून आवश्यककागदपत्रे व संमतीपत्र प्राप्त करून घेणे. अशा पात्र वारसांचा सर्व आवश्यक कागदपत्रांनुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर तसा तक्ता व कागदपत्रे स्कॅन करुन संबंधित क्षेत्रिय कार्यालयास पाठवून नियुक्ती प्रक्रिया गतीमान करण्यात आली आहे.

- **आपले सरकार या तक्रार निवारण प्रणालीवर दाखल होणाऱ्या तक्रारींचा निपटारा**

  आपले सरकार पोर्टलवर प्राप्त झालेल्या ११४३५ तक्रारींपैकी ११२९७ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित तक्रारींची संख्या १% आहे.

- **पी.जी.पोर्टल या तक्रार निवारण प्रणालीवर दाखल होणाऱ्या तक्रारींचा निपटारा**

  पी.जी.पोर्टलवर प्राप्त झालेल्या ३६२ तक्रारींपैकी ३१० तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित तक्रारींची संख्या १५% आहे.

- **कर्मचारी प्रशिक्षण**

  कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना करण्यासाठी महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी प्रचंड तणावाखाली रात्रंदिवस काम करित होते. त्याअनुषंगाने परिमंडळ १ ते ५ मधील सर्व क्षेत्रिय कार्यालयातील एकूण ३७०० अधिकारी व कर्मचारी यांना मानसोपचार तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

  तसेच Art of Living या संस्थेद्वारे आरोग्य व आनंद या विषयावर मनपा सेवकांसाठी ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

- **कोरोना विषयक कामकाज**

  कोरोना संसर्गजन्य विषाणूमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत महापालिका क्षेत्रात नियंत्रणास्तव प्रस्तावित करण्यात आलेल्या प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता व पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्र व लॉकडाउन टप्प्याटप्प्याने उठविणे (Mission Begin Again) या संदर्भातील आदेश वेळोवेळी निर्गमित करण्यात आले.

  कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना करण्यासाठी महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांची कोरोना विषयक कामकाजाकरिता पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध कोविड सेंटर व स्वॅब सेंटरवर सामान्य प्रशासन, आस्थापना विभागामार्फत सेवक नियुक्ती आदेश काढण्यात आले.

**सन २०२१ –२२**

- **मनपा प्रशासनातील विविध खात्यातील कर्मचाऱ्यांची कामाचे स्वरूपानुसार Training Need Analysis (प्रशिक्षण गरजेचे विशेषण)**

  कर्मचाऱ्यांना सोपविलेल्या कामकाजात व कर्तव्य पार पाडण्यात सक्षम बनविणे या माध्यमातून गतिमान व सक्षम प्रशासन निर्माण करण्याकरिता प्रत्येक अ ते ड संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्याचे कर्तव्यनिहाय प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. कर्तव्यनिहाय प्रशिक्षण देण्याकरिता प्रत्येक अधिकारी/कर्मचारी त्यांच्या विभागात कोणत्या स्वरूपाचे काम करतो, त्यास कोणती जबाबदारी सोपविण्यात आली आहे याबाबतची माहिती संकलीत करून त्यांचे Training Need Analysis करून कोणत्या विषयावर प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, याबाबत निश्चिती करून प्रशिक्षण कार्यक्रम (Training Calendar) करणे शक्य होणार आहे.

## (१७) <u>आपत्ती व्यवस्थापन विभाग</u>

**सन २०२०–२१**

- आपत्ती व्यवस्थापन विभाग, मुख्य इमारत, पुणे महानगरपालिका येथे आहे. पुणे मनपा 'मुख्य आपत्ती व्यवस्थापन विभाग' २४x७ तास सुरु करण्यात आले असून, सदर केंद्रामध्ये सेवकांची २४ तास नेमणुक करण्यात आलेली आहे. या विभागामध्ये आपात्कालीन परिस्थितीमधील व कोरोना विषयक तक्रारी दुरध्वनी संबंधित विभागांना कळविल्या जातात व संबंधित नागरिकांना योग्य ते मार्गदर्शन केले जात होते. अग्निशमन दल, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस व सिंचन भवन यांचेशी समन्वय साधुन तक्रारीचे निराकरण केले गेले.
- आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील सन २०२०–२१ करीता अंदाजपत्रकीय तरतुद र.रू.८,२१,८०,०००/- इतकी आहे या तरतुदीचा विविध आपात्कालीन कामांवर विनियोग करण्यात येत आहे.

**सन २०२१–२२**

- आपत्ती व्यवस्थापन विभागाकरीता सन २०२१–२२ मध्ये जनजागृती, प्रशिक्षण,आराखडयांचे अद्यावतीकरण, पर्जन्यमापन यंत्रणेचे देखभाल – दुरूस्ती व आपात्कालीन परिस्थितीत मदत इ.करीता तरतुद अंदाजे र.रू. ११.३७ कोटी प्रस्तावित केली आहे.
- सन २०२१–२२ मध्ये आपत्ती व्यवस्थापन विभागाचे आपात्कालीन परिस्थितीमध्ये अत्याधुनिकरित्या उपयोग होणे करीता सुधारीकरण व अद्यावतीकरण करण्यात येणार असून याचा उपयोग भविष्यात येणाऱ्या आपात्कालीन परिस्थितीत होणार आहे.

## (१८) समाज विकास

**सन २०२०–२१**

**सन २०२०–२०२१ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे ठळक बाबी**

- समाज विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणेत येते. याकरीता सन २०२०–२०२१ चे अर्थसंकल्पात र. रू. १,१२,६७,६४,०००/– तरतूद करणेत आली आहे.
- पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत दारिद्रय रेषेखालील व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी खालीलप्रमाणे योजना राबविणेत येतात.
- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाल अंशदायी योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजना दारिद्रय रेषेखालील कुटुंबासाठी सन २०१४ पासून राबविणेत येत आहे. या योजनांकरीता शासनाकडून निधी प्राप्त होतो. या व्यतिरिक्त मनपा अर्थसंकल्पातील बांधील खर्च वजा जाता ५% रक्कम महिला बाल कल्याण, ५% रक्कम मागासवर्गीयांसाठी व ५% रक्कम दिव्यांगांसाठी राखून ठेवली जाते. खात्यामार्फत महिला बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, युवक कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना इ. योजना राबविल्या जातात.
- **स्वयंरोजगार उपक्रम –** व्यवसाय प्रशिक्षण, उद्योजकता विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी अनुदान केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी, क्षमता बांधणी व प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व नोकऱ्यांची उपलब्धता, स्वयंरोजगार कार्यक्रम, फेरीवाल्यांना सहाय्य, शहरी बेघरांना निवारा योजना शासनाच्या निधीतून राबविल्या जातात. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरिकांसाठी सेवा केंद्र, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तु विक्री करीता आधार केंद्र यांचा समावेश आहे.
- **बचत गटांसाठी योजना –** शहर पातळीवर सुमारे ८५७७ बचत गट कार्यरत असून बचत गट स्थापनेसाठी महिलांना प्रशिक्षण, फिरता निधी, बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी प्रदर्शन व विक्री करीता अर्थसहाय्य, स्वस्त धान्याची दुकाने देणे, तसेच मनपाच्या प्राथमिक शाळेतील सुमारे ७०००० विद्यार्थ्यांना शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत मध्यान्ह भोजन व बालवाडीतील १२००० मुलांना बचत गटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो.
- **महिलांसाठी योजना –** विधवा महिलांना अनुदान, महिलांना कुटुंब नियोजनासाठी प्रोत्साहन, स्त्री संसाधन केंद्र (सक्षमा कक्ष), महिला/युवती यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण, मुलगी दत्तक योजना, पाळणाघर, वस्तीपातळीवरील विविध प्रशिक्षण वर्ग व अनुदान, महिलांसाठी योगासन वर्ग इ. योजना राबविण्यात येतात.
- **विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना –** इ. १० वी व इ. १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लास फी अर्थसहाय्य, सीईटी क्लास फी अर्थसहाय्य, उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल करीता अर्थसहाय्य, कमवा व शिका योजना, इ. १० वी व इ. १२ वी मध्ये ८०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य, स्पोकन इंग्लिश वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, घाणभत्ता मिळणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना अर्थसहाय्य, पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य, स्पर्धा परिक्षा केंद्र, मनपाच्या माध्यमिक प्रशालेतील मुलांना शैक्षणिक साहित्य इ. उपक्रम राबविले जातात.
- **भौतिक सुविधा उपक्रम –** झोपडपट्टीमध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे, झोपडी दुरूस्ती, वीज कनेक्शन, नळ कनेक्शन इ. करीता मागासवर्गीय यांना अर्थसहाय्य तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील ४०० विद्यार्थ्यांचा भोजनाचा खर्च दिला जातो.
- **सामाजिक उपक्रम –** वृद्धांसाठी विरंगुळा केंद्र, व्यसनमुक्तीसाठी अर्थसहाय्य, रस्त्यावरील मुलांसाठी घरटं प्रकल्प, दिवसरात्र निवारा प्रकल्प, बाल विकास केंद्र इ. उपक्रम राबविण्यात येतात.

- **दिव्यांग कल्याणकारी योजना –** दिव्यांगाना मोफत पीएमपीएमएल बसपास, कृत्रिम अवयव घेणे, स्वयंरोजगार, उच्च शिक्षण, प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य, महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य, कुष्ठ पिडीत व १००% अतितीव्र अपंग व्यक्तीकरिता वार्षिक अर्थसहाय्य दिले जाते.
- सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षापासून पुणे महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये जेण्डर बजेटची अंमलबजावणी करणेत येत आहे.
- पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पुणे शहरात औंध, येरवडा, हडपसर, वारजे, वडगांवशेरी, टिंगरेनगर, सावित्रीबाई फुले स्मारक भवानी पेठ, बिबवेवाडी या ठिकाणी लाईट हाऊस प्रकल्प सुरू आहेत.
- प्रत्येक घरामध्ये एक व्यक्ती डिजीटल साक्षर व्हावा या उद्देशाने पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पुणे शहरात विविध ठिकाणी डिजीटल लिटरसी सेंटर सुरू आहेत.

**सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक –**

- समाज विकास विभागामार्फत वरील योजनांची अंमलबजावणी करणेत येते. या करीता तसेच नव्याने राबविणेत येणाऱ्या योजनांकरीता २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पात र. रू. १३७.२५ कोटी ची तरतूद सुचविणेत आली आहे.
- **सन २०२१-२०२२ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**
- MPSC, UPSC पुर्व परिक्षेत उत्तीर्ण होऊन मुख्य परिक्षेला पात्र होणाऱ्या गुणानुक्रमे प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांना पुस्तके खरेदीसाठी अर्थसहाय्य करणे.
- खादी ग्रामोद्योग आयोगाच्या नोडल एजन्सी असणाऱ्या राष्ट्रीय कुंभारी प्रशिक्षण संस्थेबरोबर स्वयंरोजगार कार्यक्रम राबविणे.
- Gender Responsibility अभ्यासगट तयार करणे व शहर पातळीवर महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे.
- सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी Safety Mapping व Safety Audit करणे.

## (१९) <u>कामगार कल्याण विभाग</u>

**सन २०२० – २१**

- **मृत सेवकांच्या वारसांना अर्थसहाय्य –**

  मृत सेवकांच्या ५४ वारसांना र.रु. २८.३५ लाख अर्थसहाय्य प्रदान करण्यात आलेले आहे.
- **कामगार कल्याण निधी –**

  कामगार कल्याण निधीचे सभासद असलेल्या मृत सेवकांच्या ५१ वारसांना र.रु. ११.४७ लाख वारस अनुदान वितरित करणेत आले.
- **मराठी भाषा संवर्धन समिती –**

  मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत पुणे मनपाच्या विविध उद्यानांमध्ये साहित्यिक कट्टे निर्मित करण्यात आले आहेत. सदर कट्ट्यांवरुन मराठी भाषा संवर्धनाचे विविध कार्यक्रम घेण्यात आले.
- **ध्वजदिन निधी संकलन –**

  सन २०२०-२१ मध्ये मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार मनपा अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून र.रु. २०,४३,१२५/- ध्वजदिन संकलित करण्यात आला आहे.
- **कोरोना विषाणू सुरक्षा कवच योजना –**

  कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) प्रतिबंधक उपाययोजनेकामी कार्यरत १५ अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्येकी र.रु. २५ लाख प्रमाणे एकूण र. रु. ३.७५ कोटी अर्थसहाय्य कार्यकारी समिती, कामगार कल्याण निधी व मा. महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने वितरित करणेची कार्यवाही सुरु आहे.

**सन २०२१ – २२**

- **कामगार कल्याण निधी –**

  कामगार कल्याण निधींतर्गत विहित विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये गुणवंत कामगार पुरस्कार, शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती, विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, इत्यादींचा समावेश आहे.

- **मराठी भाषा संवर्धन समिती –**

  मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत आकाशवाणीवर 'आपली मराठी' हा कार्यक्रम प्रसारित करणे, मराठी आठवड्याच्या निमित्ताने ग्रंथ महोत्सव, कवी संमेलन, साहित्य पुरस्कार, साहित्यीक कट्टे, मनपा अधिकारी/कर्मचारी व शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, नाट्यप्रयोग सादरीकरण, साहित्य संमेलन इत्यादी उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे :

- **अपघात विमा योजना –**

  पुणे महापालिका कायम आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास वा अपंगत्व आल्यास त्यांच्या नामनिर्देशित वारसदारास वा त्यास विमा निधी म्हणून एक ठोक रक्कम मिळावी या हेतूने पुणे महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा राबविणेत येत आहे.

- **महिलांसाठी विविध योजना/सांस्कृतिक कार्यक्रम/प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे –**

  पुणे महानगरपालिकेतील महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी महिला दिनानिमित्त विविध सांस्कृतिक, प्रबोधनपर आणि इतर बाबींच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम व विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणेचे प्रस्तावित आहे.

## (२०) भूसंपादन व व्यवस्थापन विभाग

**सन २०२० – २१**

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते.
- चांदणी चौक येथील महत्वाकांक्षी रस्ते व वाहतुक नियोजन प्रकल्प राबविण्यासाठी करावयाचे जागेच्या भूसंपादनाकरीता राज्य शासनाकडून र.रू.१८५ कोटी पैकी र.रू.१३५.७० कोटी चार हप्त्यामध्ये प्राप्त झाले आहेत. तसेच र.रू. ४८.८० कोटी रकमेचा पाचवा हप्ता वितरीत करणेबाबतचे शासन निर्णय क्र.नगरो-२०१८/प्रक्र३५२(II)/नवि -३३/मंत्रालय,मुंबई दि.०३/१२/२०२० प्राप्त झालेले आहेत. सदरची रक्कम मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयाकडून पुणे महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सन २०२१ – २२**

**दृष्टीक्षेपात अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२१-२२**

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते. जुना भूसंपादन कायदा १८९४ नुसार एकुन १५६ भूसंपादन प्रकरणाची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी , पुणे यांचे कार्यालया अतंर्गत विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१५ व १६ यांचेमार्फत सुरु होती. तथापि भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार अंमलबजावणी करणेकरिता त्यांनी एकुण २६४ चालु प्रकरणांपैकी ६१ प्रकरणांची नविन भूसंपादन कायद्यानुसार सद्यस्थितीत कार्यवाही सुरु ठेवली असून ऊर्वरित २०३ प्रकरणे संबंधित खात्यांच्या प्राधान्यक्रमानुसार व उपलब्ध होणा-या आर्थिक तरतुदीनुसार पुनर्जिवित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. चालू असलेल्या भूसंपादनासाठी, निवाडा मंजूरीवर प्रलंबित प्रकरणी तसेच निवाडा मंजूर असलेली तथापि नुकसान भरपाई रक्कम प्राप्त नसलेने निवाडा जाहीर होणेवर प्रलंबित एकुण ३८ प्रकरणांसाठी र.रू.१७१० कोटी इतकी तरतुद आवश्यक आहे.

- पुणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजना आराखडयामधील विविध आरक्षित जागांचा प्राधान्याने विकास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक तरतुदी आतापर्यंत भूसंपादन व व्यवस्थापन या विभागाचे अर्थशिर्षकावर करण्यात येत होत्या. तथापि यापुढे संबंधित आरक्षण विकसित करणाऱ्या खात्यांनी त्या आरक्षणाच्या जागांचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक त्या तरतुदी त्या-त्या खात्यांचे अर्थशिर्षकावर करणेत येणार आहे.

- भूसंपादन व व्यवस्थापन विभागामार्फत चालू असलेले भूसंपादन विषयक महत्वपुर्ण प्रस्ताव.

  १) चांदणी चौक उड्डाणपूल २) पर्वती तळजाई ३) जायका (मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प) ४) क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे स्मारक, संगमवाडी ५) भिडेवाडा ६) वारजे शिवणे नदीकाठचा रस्ता

## (२१) अतिक्रमण निर्मुलन विभाग

### सन २०२०–२०२१

- पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्व रस्ते/पदपथावरील अनाधिकृत अतिक्रमणांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.
- पथविक्रेता अधिनियम २०१४ नुसार सर्वेक्षण करण्यात आलेल्या पथ विक्रेत्यांचे तात्पुरत्या स्वरुपात विविध झोन शहरामध्ये निर्माण करण्यात येऊन पुनर्वसन करण्यात येते.
- महापालिका हद्दीत तात्पुरत्या स्वरूपात मांडव, कमान परवाने देणे, परवाना शुल्क फेरीवाला प्रमाणपत्र धारकांकडून वसुल करणे व अनधिकृत बांधकामांवरील कारवाईसाठी मनुष्यबळ यंत्रणा पुरविणे.
- सार्वजनिक रस्ता व पदपथारीवरील अतिक्रमण निर्मुलन अहवाल खालीलप्रमाणे

| महिना | स्टॉल | हातगाडी | पथारी | सिलेंडर | शेड/ झोपड्या | इतर | व्यावसायिकवाहने |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल २०२० ते नोव्हें.२०२० | १८ | २३१० | १५८५३ | – | ६३४ | ३९२२ | ४७ |

- स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत पुणे महापालिका हद्दीतील बेवारस, बंद वाहनांवर पुणे शहर पोलीस वाहतुक विभाग यांच्यासह कारवाई करण्यात येते. तसेच कारवाई मधील जप्त मालांचा लिलाव करण्यात येतो.
- सन २०२०-२१ मध्ये दि.३०/११/२०२० पर्यंत परवाना शुल्कापोटी र.रू. १४,५३,६९०/- जमा झाली आहे.
- केंद्र शासनामार्फत पी.एम.स्वनिधी अंतर्गत फेरीवाले यांना र.रु.१०,०००/- कर्ज स्वरुपात देण्याबाबत योजना प्रस्तुत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी या खात्यामार्फत करण्यात येत आहे.
- कोविड-१९ कालावधीत शहरातील निर्वासित मजूर यांना निवारा तसेच कोव्हिड केअर सेंटर मध्ये भोजन व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले होते.
- सन २०२०-२१ साठी एकुण परवाना शुल्क र.रु. १४,१५,५०,०००/- नियोजित आहे.

### सन २०२१–२२

**प्रस्तावित नाविन्यपुर्ण प्रकल्प किंवा योजना**

- फेरीवाला झोन निर्माण करणे. झोन फलक प्रदर्शित करणे.
- प्रत्येक परिमंडळ कार्यालय हद्दीमध्ये गोडाऊन बांधणे, सी.सी.टिव्ही कॅमेरा व तद्नुषंगिक कामे करणे, पथारी प्रकल्प अंमलबजावणी करणे. तसेच पथारी व्यावसायिकांचे पुनर्वसनाकरिता विविध ठिकाणी नव्याने ओटा मार्केट बांधणे.
- परिमंडळ १ ते ५ मध्ये अतिक्रमण विभागाने कारवाई करुन आणलेल्या मालाकरिता टॅगिंग पद्धतीने मालाची नोंद ठेवणे, व संगणक प्रणाली विकसित करणे.

# दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक–

## प्रमुख जमा बाबी :–

### (१) स्थानिक संस्था कर

**सन २०२०–२१**

- मे. केंद्र व राज्य शासनाने दि. ०१/०७/२०१७ पासून वस्तू व सेवा कर (GST) लागू केलेला असल्याने स्थानिक संस्था कर बंद करण्यात आल्याने मे. राज्य शासनाकडून माहे जुलै २०१७ पासून दरमहा वस्तू व सेवा कर अनुदान पुणे मनपास प्राप्त होत आहे.
- सन २०२०–२०२१ या आर्थिक वर्षात मे. राज्य शासनाकडून दरमहा र.रु. १५३.२३ कोटी प्रमाणे वस्तू व सेवा कर अनुदानापोटी र.रु.१८३८.७६ कोटी, १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदानापोटी र.रु. २५० कोटी व इतर जमेपोटी र.रु.१.१५ कोटी अशी एकुण र.रु. २०८९.९१ कोटीचे उत्पन्न अंदाजित केले आहे.
- माहे एप्रिल २०२० ते दि. १२ जानेवारी २०२१ अखेर वस्तू व सेवा कर अनुदान र.रु. १५३२.३० कोटी, १% मुद्रांक शुल्कअधिभार अनुदान र.रु. २४.७२ कोटी असे एकूण र.रु. १५५७.०२ कोटी जमा झाले आहे.

  दि. १३ जानेवारी २०२१ ते मार्च २०२१ अखेर संभाव्य उत्पन्न र.रु. ५४४.०६ कोटी उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

| क्र. | अपेक्षित उत्पन्न तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | माहे फेब्रुवारी २०२१ ते मार्च २०२१ या दोन महिन्यांचे वस्तू व सेवा कर अपेक्षित अनुदान (दरमहा र.रु. १५३.२३ कोटी प्रमाणे) | ३०६.४६ कोटी |
| २ | माहे ऑक्टोबर १९ ते मार्च २०२० या सहा महिन्याचे १% मुद्रांक शुल्क (मे. राज्य शासनाकडे थकीत असलेले अनुदान) | १७६.८१ कोटी |
| ३ | माहे एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२० या सहा महिन्याचे १% मुद्रांक शुल्क (मे. राज्य शासनाकडे थकीत असलेले अनुदान) | ६०.७९ कोटी |
| | एकूण संभाव्य प्राप्त होणारे अपेक्षित उत्पन्न | ५४४.०६ कोटी |

- तथापि, मे. राज्य शासनाकडून पुणे महानगरपालिकेस वस्तू व सेवा कर अनुदान दरमहा र.रु. १५३.२३ कोटी प्राप्त होत आहे. तसेच कोविड १९ चे प्रार्दुभावामुळे पुणे मनपा हद्दीत करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदानाचे उत्पन्न घटले आहे. त्यामुळे स्थानिक संस्था कराचे उत्पन्नाचे दिलेले उद्दीष्ट अंदाजे र.रु. ११ कोटीने कमी होण्याची शक्यता आहे.
- सन २०२१–२०२२ या आर्थिक वर्षात मे. राज्य शासनाचे राजपत्रानुसार वस्तू व सेवा कर अनुदान वितरीत करण्याच्या सूत्रानुसार मागील वर्षाच्या उत्पन्नामध्ये ८ टक्के वाढ गृहीत धरुन दरमहा र.रु.१६५.४८ कोटी प्रमाणे वस्तू व सेवा कर अनुदानापोटी र.रु. १९८५.८६ कोटी इतके, १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदानापोटी मे. राज्य शासनाचे दि.२९/०८/२०२० चे राजपत्रानुसार दस्तऐवजावर विहीत कालावधीकरीता मुद्रांक शुल्काची सवलत देण्यात आलेली असल्याने महानगरपालिका व नगरपालिका मधील स्थानिक स्वराज्य संस्था अधिभार (LBT) १ टक्क्याऐवजी ०.५० टक्के प्रमाणे अनुदान वितरीत करण्यात येणार असल्याने त्यापोटी र.रु. १२.५० कोटी दरमहा प्रमाणे र.रु. १५० कोटी व इतर जमेपोटी र.रु. ०.५५ कोटी असे एकूण र.रु. २१३६.४१ कोटीचे उत्पन्न गृहीत धरण्यात आलेले आहे.

## (२) मिळकत कर

**सन २०२०–२१**

**कर आकारणी व कर संकलन विभाग २०२०–२१ उद्दीष्ट र.रु. २६०३ कोटी**

- सन २०२०–२१ या वर्षाचे मिळकतकर देयके कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावामुळे लॉकडाऊन जाहिर झाल्यामुळे छपाई करणेस विलंब झाला. परंतु नागरीकांपर्यंत संगणकीय प्रोग्राममधुन डेटामध्ये असलेल्या मोबाईल क्रमांक व ईमेल द्वारे मिळकतकराची बिलांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तसेच नागरिकांना पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर मिळकतकराचे बिल उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. यामुळे नागरिकांना त्यांच्या मिळकतींचा मिळकत कर भरण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण/गैरसोय झालेली नसल्याने सदर कालावधीत नागरिकांनी पुणे महानगरपालिकेकडे मिळकतकर जमा केलेला आहे. लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये ऑनलाईन मिळकतकर भरणेकरीता सर्व प्रकारचे ऑनलाईन ऑप्शन (पर्याय) उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.
- पुणे महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये प्रथमच सुमारे ७,५९,४२७ मिळकतधारकांनी दि. ०१/०४/२०२० ते दि. २६/०१/२०२१ या कालावधीमध्ये रक्कम रु.१३६९.०७ कोटी मिळकतकर जमा झालेले असून दि.३१/०३/२०२१ अखेर र.रु. ३००/–कोटी इतकी रक्कम जमा होणे अपेक्षित आहे.
- या वर्षी बँकेच्या सौजन्याने मिळकतकराची बिले विना खर्च छपाई करुन माहे मे/जुन मध्ये सर्व नागरिकांना पोस्टामार्फत पाठविण्यात आलेली आहेत. यामुळे किमान र.रू.५० लाखाऐवढी बचत झालेली आहे.
- संपूर्ण कर जमा करणाऱ्या मिळकतधारकांना सर्वसाधारण करामध्ये ५ ते १० टक्के सवलत दि.०१/०४/२०२० ते ३१/५/२०२० पर्यंत ठेवण्यात आली होती. तथापि मा.स्थायी समिती ठ.क्र.२०३ दि.२/६/२० अन्वये कोरोना विषाणू च्या प्रार्दुर्भावामुळे सदरची मुदत दि.१/६/२०२० ते दि ३०/६/२०२० अखेर वाढविण्यात आलेली आहे. या कालावधीत मिळकतकरापोटी सुमारे र.रू. ६७८.८४ कोटी इतकी रक्कम जमा झालेली आहे.
- जे निवासी मिळकतधारक सन २०–२१ या वर्षाचा संपूर्ण मिळकतकर भरतील त्यांना ५ लाखाचा अपघाती विमा संरक्षण पुणे मनपाकडून देणेत येत आहे.
- मिळकतकराच्या डेटाबेसमध्ये सुमारे ९,८७,४२६ भ्रमणध्वनी व ई–मेल ७,७९,६२६ समाविष्ट केलेले आहेत. भ्रमणध्वनी क्रमांकावर व ई–मेल वर सन २०२०–२१ मधील मिळकतकर विषयक मागणीची रक्कम मुदतीत भरणेबाबत तसेच मुदतीत कर न भरल्यास दरमहा २% शास्ती आकारणीबाबतची माहिती मिळकतकरधारकांना पाठविण्यात येते.
- १००० स्वे फुटापर्यंतच्या निवासी स्वरूपाच्या भोगवटापत्र न घेतलेल्या मिळकतींना तीनपटची शास्ती दि.१/४/२०१९ पासून रद्द करणेत आलेली आहे. तसेच ज्या निवासी स्वरूपाच्या भोगवटापत्र न घेतलेल्या १००१ स्वे फुटापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींना तीनपट ऐवजी दिडपट शास्ती लागु करणेत आलेली आहे.
- मिळकतकर आकारणीचे जुन्या दस्ताऐवजांचे स्कॅनिंग व संगणकावर अे फॉर्म अपलोडींगचे काम जास्तीत जास्त प्रमाणात करणेत आलेले आहे. यामुळे मिळकतकराच्या आकारणीचे सर्व दस्तऐवजांचे जतन होत आहे.
- मिळकतकराची रक्कम जास्तीत जास्त ऑनलाईन स्विकारणेबाबत खात्याकडून प्रोत्साहन देण्यात आले असून सन २०१८–२०१९ मध्ये ४७.१९% ऑनलाईन कलेक्शन होते व २०१९–२० मध्ये ४८.२३% व २०२०–२१ माहे नोव्हेंबर अखेर ७०.६९% ऑन लाईन कलेक्शन झाले आहे. Online मिळकतकर भरण्यात नागरिकांच्या संख्येत वाढ झालेली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील व नव्याने समाविष्ट केलेल्या मिळकतींची निवासी, बिगरनिवासी, मोकळ्या व एकत्रित अशा सुमारे १०,८५,३८२ इतक्या मिळकती आहेत तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या गावाकडील ८ड वरील नोंदी नुसार मिळकतींना आकारणी करणेत आलेली आहे.

- सन २०२०-२१ मध्ये अंदाजपत्रकामध्ये.पाणीपट्टी मध्ये १५ % दरवाढ करून मिळकतकरापोटी र.रू.२२५३/कोटी इतके उत्पन्न दिले होते यामध्ये मा.स्थायी समितीने थकबाकी मध्ये र.रु. ३५०/-कोटी इतकी रक्कम वाढविण्यात येवून अंदाजित र.रू.२६०३/-इतके उत्पन्न सन २०२०-२१ साठी दिले आहे.

**अभय योजना -**

- सन २०२०-२१ मध्ये मा.स्थायी समिती ठ.क्र. ५५५ दि. २४/९/२०२० अन्वये दि. ०२/१०/२०२० ते दि. ३०/११/२०२० या कालावधीसाठी मिळकतकर वसुलीसाठी २% शास्ती/दंडावर ८०% सवलत देण्याची अभय योजना रक्कम रु.१ ते ५० लाखापर्यंतच्या मिळकतींना लागू करण्यात आलेली होती. सदर अभय योजनेमध्ये १,१४,६३५ इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु.३५१.१९ कोटी इतका मिळकतकर पुणे मनपाकडे जमा केलेला असून रक्कम रु.१७६.२५ कोटी इतकी सवलत मिळकतधारकांना देण्यात आलेली आहे.
- चालू वर्षी २०० सेवकांची ठेकेदारामार्फत घेण्याची निविदा प्रक्रीया सुरु केलेली असल्याने जादा सेवक उपलब्ध होणार असून मिळकतकर आकारणीचे कामकाज जलद गतीने होईल.
- मा. स्थायी समिती ठराव क्र. ७९४ दि. ०८/१२/२०२० अन्वये अभय योजने अंतर्गत मुदतवाढ देण्यात आल्याने दि. १०/१२/२०२० ते दि. ३१/१२/२०२० या कालावधीसाठी मिळकतकर वसुलीसाठी २% शास्ती / दंडावर ७५% सवलत या अटींवर १८,१५९ इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु. ६९.१४ कोटी इतका मिळकतकर पुणे मनपाकडे जमा केलेला असून रक्कम रु. १५.५५ कोटी इतकी सवलत मिळकतधारकांना देण्यात आलेली आहे.
- त्याचप्रमाणे दि. ०१/०१/२०२१ ते दि. २६/०१/२०२१ या कालावधीसाठी मिळकतकर वसुलीसाठी २% शास्ती / दंडावर ७०% सवलत रक्कम रु. १ ते ५० लाखापर्यंतच्या मिळकतींना लागू करण्यात आलेली आहे. दि. ०१/०१/२०२१ ते दि. २६/०१/२०२१ अखेर पर्यंत १६,९९० इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु. ६७.९५ कोटी इतका मिळकतकर पुणे मनपाकडे जमा केलेला असून मिळकतधारकांना रक्कम रु. ८.९७ कोटी इतकी सवलत देण्यात आलेली आहे.
- **कर आकारणी व कर संकलन विभाग सन २०२१-२०२२**

**उद्दीष्ट र.रु. २६५०/- कोटी**

- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता म्हणजेच दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ अखेर मिळकत कराची संपूर्ण रक्कम भरल्यास सर्वसाधारण करामध्ये ५% ते १०% सवलत देणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. जेणेकरुन पहिल्या २ महिन्यामध्ये मिळकत कराची रक्कम मोठ्याप्रमाणात जमा होईल.
- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये नव्याने सर्वसाधारण करामध्ये (वार्षिक करपात्र रक्कमेवर) प्रत्येक टप्प्यास (Slab) ५.५%, साफसफाई मध्ये ३.५%, जलनि:स्सारण करामध्ये २% अशी वाढ सुचविण्यात आली आहे. सदरची वाढ ही मोबाईल टॉवर कंपन्या, आयटी आणि आयटीईएस कंपन्या यांनाही लागू राहील. त्यामुळे सुमारे र.रु.१३०/- कोटी पेक्षा जास्त वाढीव उत्पन्न अपेक्षित आहे.
- ग्रामपंचायतकडील कर आकारणी न झालेल्या मिळकती व पुणे शहरातील हद्दीतील नव्याने बांधकाम झालेल्या (नव्याने भोगवटा पत्र मिळालेल्या) मिळकतींची आकारणी करणेत येत असून दि.०१/०४/२०१९ पासून नव्या भोगवटा घेतलेल्या निवासी बांधकांमांना/नव्याने तयार झालेल्या निवासी मिळकतींना वार्षिक करपात्र रक्कमेत ४०% सवलत बंद केल्याने वार्षिक करपात्र रक्कमेत वाढ झालेली आहे यामुळे पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होत आहे.
- जास्तीतजास्त सेवक कर आकारणी व कर संकलन विभागास उपलब्ध करून देण्यात येत आहेत. वापरात बदल झालेल्या मिळकती, आकारणी न झालेल्या मिळकती शोधून आकारणीचे कामकाज करण्यात येत आहे. थकबाकीदारकडून मिळकतकराची वसुली करणेत येत आहे. यामुळे पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

* पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नव्याने प्रस्तावित २३ गावांचा समावेश झाल्यास त्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही कमीत कमी वेळेत करण्याचे नियोजन खात्यामार्फत करणेत येत आहे.
* २०२१-२२ या वर्षामध्ये मिळकतकर थकबाकीची रक्कम कमीत कमी करणे व आकारणी न झालेल्या जास्तीत जास्त मिळकतींची आकारणी करण्याचे नियोजन करण्यात येत असून त्यामुळे महसुलात निश्चित वाढ होण्यास मदत होणार आहे.

## (३) बांधकाम परवानगी व विकास शुल्क

**सन २०२०-२१**

* सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता सद्यस्थितीतील बांधकाम क्षेत्रातील कल, प्रस्ताव संमतीकरण व जमा महसूल यांचा ताळमेळ पाहता बांधकाम विकास विभागाकडील जमा महसूलाचे र. रू. ७५० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे तसेच कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे जमेचे उद्दीष्ट साध्य झाले नाही. माहे डिसेंबर सन २०२० अखेर सुमारे र.रू. १९७.८३ कोटी जमा झालेले आहेत. तसेच ३१ मार्च २०२१ अखेर पर्यंत एकूण र.रू.३५० कोटी जमा होणे अपेक्षित आहे.

**सन २०२१-२२ (उद्दिष्ट र.रू.९८५ कोटी)**

* सन २०२१-२२ या अंदाजपत्रकीय वर्षात जमा महसूल रक्कम रुपये ८५० कोटी अपेक्षित आहे. तसेच ऑनलाईन ऑटो डिसीआर (Auto DCR) जलदगतीने बांधकाम परवानगीची कार्यपद्धती अवलंबून सदरचे उद्दीष्ट्य पूर्ण करणे शक्य होणार आहे. पुणे मनपा हद्दीसाठी मंजूर करण्यात आलेल्या UDCPR – 2020 एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली मध्ये नव्याने प्रिमियम एफ.एस. आय., आय.टी./ आय.टी.ई.एस., ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट इ. इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस. आय. व विशेष इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस. आय. पोटी प्रिमियम जमा होणार असल्याने सदर उद्दीष्ट्य गाठणे शक्य होणार आहे.

## (४) पाणीपट्टी

**सन २०२०-२१**

* सन २०२०-२१ सालासाठी मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु. ५७०.६० कोटी (२२५.२२ सेवकवर्ग व इतर तदनुषंगिक सहित) व भांडवली कामासाठी र.रु. ५९५.२५ कोटी असे एकुण र.रु. ११६५.८५ कोटींची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदींचे अनुषंगाने सन २०२०-२१ सालासाठी पाणीपट्टीपोटी र.रु. २०२ कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३१/१२/२०२० रोजी पर्यत मीटरव्दारे पाणीपट्टीपोटी र.रु. ५७ कोटी जमा झालेले आहे.
* मीटरवरील दि. १०/१२/२०२० अखेर एकुण नळजोड संख्या ३९६५३ इतकी असून, थकबाकी सुमारे र.रु. ६०१.४९ कोटी आहे. दुबार पाणीपट्टी, नादुरुस्त मीटर बंद असल्याने, नळजोड बंद घोषित झोपडपट्टी मधील पाणीपट्टी, रस्ता रुंदीकरणामधील नळजोड इ. कारणांमुळे मीटर पाणीपट्टीची अवाजवी थकबाकी आलेली आहे. सध्याचे पाण्याचे मीटर बसविण्याची जबाबदारी संबंधित ग्राहकाची आहे. तसेच सदर मीटर मेकॅनिकल तंत्रज्ञानाचे असल्याने, वारंवार नादुरुस्त होत आहे. सध्याचे सुमारे ४३.९०% मीटर नादुरुस्त आहे व नादुरुस्तीच्या काळात सरासरी वापरापेक्षा जादा वापर गृहीत धरुन बिलाची आकारणी करण्यात येते व मीटर दुरुस्त केल्यानंतर सदर बिलाची दुरुस्ती करण्यात येते. बिल दुरुस्तीची कार्यवाही खात्यामार्फत करण्यात येत

असून, बिल दुरुस्ती नंतर वसुली होणारी रक्कम ही २०% ते २५% इतकी असून, अवाजवी थकबाकी निरस्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये मे.कोर्ट मार्फत लोक अदालत राबविण्यात येऊन अंदाजे र.रुपये ३३.५६ लाख इतकी थकबाकी वसूल करण्यात आली आहे.
- सन २०२०-२१ याकरीता टप्पेनिहाय (टेलास्कोपिक) पाणीपट्टी दरास मा.मुख्य सभा ठराव क्र. ५९८, दिनांक १२/०२/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. मीटरव्दारे होणाऱ्या पाणीपुरवठयाची पाणीपट्टी दरवर्षी सरासरी अंदाजे र.रु. ९९ ते १०५ कोटी इतकी जमा होते. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये ३१/१२/२०२० अखेर र.रु. ५७.०० कोटी इतकी जमा झालेली आहे.
- घरगुती व बिगर घरगुतीच्या मीटर पाणीपट्टीच्या दरामध्ये टप्पेनिहाय (टेलास्कोपिक) दरवाढ मा.मुख्य सभा ठराव क्र. २२७७, दिनांक ०५/०२/२०१६ अन्वये मान्य करण्यात आलेला आहे. यामुळे पाण्याचा कमी वापर करणाऱ्या नळजोडधारकांना कमी दराने बिल व पाण्याचा जादा वापर करणाऱ्या नळजोडधारकांना जादा दराने बिलांची आकारणी करण्यात येणार आहे. यामुळे पाणी अनावश्यक वापरावर मर्यादा येणार असून, पाणी वाया जाण्याचे प्रमाण कमी होणे अपेक्षित आहे. तसेच या वाढीव मीटर पाणीपट्टीमुळे पाणीपुरवठा करणेसाठी होणारा खर्च भरुन काढणे शक्य होणार आहे.

**सन २०२१-२२ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक (उद्दिष्ट र.रु.२०२ कोटी)**

- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये शहरातील अनधिकृत नळजोड शोधून त्यावर कारवाई करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणे वेळोवेळी लोक अदालतचे आयोजन करुन थकबाकीदारांकडून रक्कम वसुल करण्याबाबतची मोहिम सुध्दा राबविण्यात येणार आहे. समान पाणी वाटप योजनेमध्ये अल्ट्रासोनीक/ इलेक्ट्रॉमॅग्नेटीक मीटर बसविण्यात येणार असल्याने, मीटर नादुरुस्तीचे प्रमाण कमी होऊन थकबाकी कमी होण्यास मदत होणार आहे.

**वापरानुसार दर आकारणी**

| **सध्याचे दर** | | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|
| खप कि.लि./महिना | दर (सन २०२०) | खप कि.लि./महिना | दर (सन २०२१) |
| **झोपडपट्टी** | | | |
| कच्ची झोपडी | ४२.२३/ महिना | कच्ची झोपडी | ४४.३४ / महिना |
| पक्की झोपडी | ७०.३४/ महिना | पक्की झोपडी | ७३.८६/ महिना |
| **घरगुती पाणी वापर दर** | | | |
| ० ते १८.६० | ६.६९ | ० ते १८.६० | ७.०२ |
| १८.६० ते ३०.०० | ११.१८ | १८.६० ते ३०.०० | ११.७४ |
| ३०.०० ते ३७.५ | २२.२५ | ३०.०० ते ३७.५ | २३.३६ |
| ३७.५ पेक्षा जास्त | ३३.४३ | ३७.५ पेक्षा जास्त | ३५.१० |
| **बिगर घरगुती वापर दर** | | | |
| ० ते २० | ५७.८६ | ० ते २० | ६०.७५ |
| २० ते ४० | ६०.०४ | २० ते ४० | ६३.०४ |
| ४० ते ६० | ६३.०९ | ४० ते ६० | ६६.२४ |
| ६० पेक्षा जास्त | ७२.६९ | ६० पेक्षा जास्त | ७६.३२ |

## (५) <u>आकाशचिन्ह परवाना</u>

**सन २०२०–२१**

- सन २०१९–२० मध्ये जाहिरात फलकांचे व नामफलकाचे दि. ०१/०४/२० ते दि. ३१/१२/२१ अखेर अंदाजे र.रु.१.०४ कोटी एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे. परंतु प्रति चौ.फुट र.रु. २२२/– शुल्काबाबत मे. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १०६८४/२०१८ दाखल असल्याने दि. ०१/१०/१८ पासून जाहिरातदारांनी शुल्क भरलेले नाही.
- सन २०१९–२० मध्ये दि. ०१/०४/२० ते २७/१२/२०२० अखेर परमिट, परवानाचे र.रु. १२,४८,४९७/– व फॉर्म विक्रीपोटी र.रु.३,८३५/– एवढे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या (सन २००७ ते २०११) या कालावधीतील जाहिरात फलकावरील सर्व्हिस टॅक्सवरील दंड २,८३,५०,०००/ शासनास सन २०१९–२० मध्ये प्रदान केलेला आहे. तसेच सर्व्हिस टॅक्सचे दंडावर मे. ट्रॅब्यूनल कोर्टात अपील दाखल करण्यात आलेले आहे.

**सन २०२१–२२**

- सन २०२१–२२ चे जाहिरात फलकाबाबत मे.कोर्टाचा निकाल पुणे महानगरपालिकेच्या बाजूने लागल्यास दि. ०१/१०/२०१८ ते ३१/०३/२०२१ एकूण र.रु. ७३ कोटी व सन २०२१–२२ चे र.रू. ३० कोटी उत्पन्न अंदाजे खात्यास प्राप्त होऊ शकते.
- परवाना व परमिट शुल्क दरवाढ करणेबाबत खात्यामार्फत मुख्य सभेमध्ये विषयपत्र दाखल असून त्यास मान्यता मिळालेल्या दिनांकापासून नवीन दरवाढ लागू होणार असल्याने यातून अंदाजे र. रू. १ कोटी व फॉर्म विक्री पोटी र.रू. २५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.

**<u>सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील जमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.</u>**

***(आकडे रुपये कोटीत)***

| जमा बाजू | | |
|---|---|---|
| **अर्थशिर्षक** | **२०२०-२१ साठीचे जमेचे उद्दीष्ट** | **माहे डिसेंबर २०२० अखेर प्रत्यक्ष जमा** |
| सुरवातीची शिल्लक | ०.०२ | - |
| स्थानिक संस्था कर/मुद्रांक शुल्क | २३९.१५ | २४.८४ |
| वस्तु आणि सेवा कर (GST) | १८३८.७६ | १३७९.०७ |
| मिळकतकर | २३२०.२० | ९९३.६२ |
| पाणीपट्टी | ४६३.०० | २०५.३४ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ९९९.२५ | २७४.९३ |
| इतर जमा | ८५०.२६ | १५७.७२ |
| अमृत व स्मार्ट सिटी अभियान अनुदान | २.७० | २.०६ |
| शासकीय अनुदान | १९४.०४ | ६९.९० |
| प्रधानमंत्री आवास योजना | ८२.६२ | - |
| कर्ज/कर्जरोखे | ४००.०० | - |
| **एकुण रक्कम रुपये** | **७३९०.००** | **३१०७.४८** |

## *(ब) <u>दृष्टीक्षेपात सन २०२१-२२ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज-</u>*

**सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येतआहे.**

***(आकडे रूपये कोटीत)***

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | २०७०.०० |
| स्थानिक संस्था कर | १७०.५७ | वीज खर्च व दुरूस्ती | २७८.०० |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | १९८५.८८ | पाणी खर्च | ९९.९५ |
| मिळकतकर | २३५६.६७ | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | १०९.६२ |
| बांधकाम परवानगी व शहर विकास चार्जेस | ९८५.०० | औषधे, पेट्रोल/डिझेल | १५५.४० |
| | | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | १२५३.३८ |
| पाणीपट्टी | ४९२.०० | वॉर्डस्तरीय | ३४.८० |
| शासकीय अनुदान | २९८.६५ | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे | ८०.८३ |
| इतर जमा | ८७६.२१ | भांडवली व विकासाची कामे | ३४५७.४४ |
| कर्ज/रोखे | ३००.०० | अमृत व स्मार्ट सिटी अभियान वर्षा | ११०.५६ |
| प्रधानमंत्री आवास योजना | १८५.०० | अखेरची शिल्लक | ०.०२ |
| **एकुण** | **७६५०** | **एकुण** | **७६५०** |

सरत्या वर्षात कोरोना-१९ सारख्या संसर्गजन्य प्रार्दुभावावर नियंत्रण आणण्यासाठी राज्य व केंद्र शासनासह शहरातील सर्व शासकीय यंत्रणा, मा. सर्व राज्य व केंद्रशासन मंत्री महोदय, सर्व पक्षीय मा.खासदार व मा.आमदार, सर्व पक्षांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे यांचे सहकार्य मिळाले. तसेच या राष्ट्रीय आपत्तीसदृष्य परिस्थितीवर मात करण्यासाठी पुणे महागरपालिकेस अनेक स्वयंसेवी संस्था, नागरिक, खाजगी संस्था यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आर्थिक व वस्तुरुपाने खुप मोठी मदत केली. प्रशासनास सहकार्य करणाऱ्या आपणा सर्वांचे ऋण व आभार मानने प्रशासनाचा प्रमुख यानात्याने माझे कर्तव्य आहे.

सदरच्या अंदाजपत्रकामध्ये येणाऱ्या आर्थिक वर्षात शहराच्या मुलभूत गरजा व सोयीसुविधा, सार्वजनिक आरोग्य, नागरिकांना समान पाणी पुरवठयाचे नियोजन, मैलापाण्याचे शुध्दीकरण करणे, कचऱ्याचे व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यक्षम करणे, पर्यावरणाचा समतोल राखणे, अशा अनेक बाबींसह सर्वंकष व व्यापक दृष्टीकोन समोर ठेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. राज्य व केंद्र शासनाच्या योजना जास्तीत जास्त शहरवासियांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न व उत्तरदायित्व यासाठी प्रशासन कटीबद्ध असून, शहराच्या पायाभूत विकासासह व वैशिष्ठयपूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रक मा. स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

अंदाजपत्रक सादर करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, मा.अध्यक्ष स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.सर्व पक्षनेते, मा. सर्व पदाधिकारी, मा. प्रभाग समिती अध्यक्ष, मा. वृक्ष संवर्धन समिती सदस्य, मा. सर्व सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व सर्व प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो !

मा. केंद्रातील व राज्यातील सर्व माननीय मंत्रीमहोदय, मा. संसद सदस्य, मा.राज्यसभा सदस्य, मा.विधानसभा व मा.विधान परिषद सदस्य, शासनाच्या विविध महामंडळावरील सदस्य, केंद्र व राज्य शासनाचे सर्व वरिष्ठ अधिकारी यांचेही वेळोवेळी सहकार्य मिळाले, त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो !

अंदाजपत्रकाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करताना आपणा सर्वांचे सहकार्य मिळेल या विश्वासासह मी आज दिनांक २९.०१.२०२१ रोजी पुणे महानगरपालिकेतील माझे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

**(विक्रम कुमार)**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

दिनांक : २९.०१.२०२१